❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २४६ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com | Epaper - www.sandhyaepaper.com | www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून
दै. संध्याच्या
यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

## संध्या प्रहार




# ‘मनोज जरांगेंची तळमळ कळतीये’

### मराठा समाजाला न्याय देण्याची सरकारची भूमिका : मनोज जरांगे मराठा समाजासाठी लढत आहेत



■ परभणी (दै. संध्या)

परभणीतील शेतकरी मेळाव्यावरून मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील प्रचंड आक्रमक झाले आहेत. खासदार संजय जाधव यांना थेट इशारा देत त्यांनी हा मेळावा तात्काळ रद्द करण्याची मागणी केली आहे. परभणीच्या मेळाव्यात काही गडबड झाली तर मी जबाबदार राहणार नाही. मी तिथे आलो तर एकनाथ शिंदे यांना माघारी फिरणे अवघड होईल, असा दम जरांगे यांनी दिला आहे. असे असून देखील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे परभणीत शेतकरी मेळाव्यासाठी दाखल झाले. यावेळी बोलताना शिंदे यांनी अनेक विषयांवर भाष्य केलेच त्याचसोबत त्यांनी मनोज जरांगे यांचे कौतुक देखील केले आहे. मनोज जरांगे हे मराठा समाजासाठी लढत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच त्यांनी तळमळ आम्हाला कळत असल्याचेही शिंदे म्हणाले. भाषणाच्या सुरुवातीला बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, ही जमवलेली गर्दी नाही. ही भाड्याने आणलेली माणसं नाहीत. हे सगळे माझे लाडके भाऊ, लाडके शेतकरी, लाडके युवा आणि लाडक्या बहिणी आणि लाडके शेतकरी आहेत. सकाळी 11 वाजल्यापासून आपण या ठिकाणी बसून आहात. तुमच्यासमोर दंडवत घातला पाहिजे. खऱ्या अर्थाने शिवसेना ही बाळासाहेबांच्या विचारांची शिवसेना पुढे नेण्याचे काम आपण करत आहोत. परवा रक्षाबंधन झाले, हजारो लाडक्या बहिणी आल्या होत्या, आजही अनेक लाडक्या बहीणींनी राख्या बांधल्या. माझे सगळ्यात मोठे पद म्हणजे मी लाडक्या बहीणींचा लाडका भाऊ.

एकनाथ शिंदे म्हणाले, आज या ठिकाणी मराठा समाज देखील मोठ्या प्रमाणावर आला आहे. मी तुम्हाला सांगू इच्छितो हा बळीराजा पोशिंदा आहे. अन्नदाता आहे. त्यामुळे कुठलेही राजकारण या शेतकऱ्यांच्या आड येऊ नये, अशी आमची अपेक्षा आहे, मनोज जरांगे यांची देखील तीच अपेक्षा आहे. मनोज जरांगे यांची तळमळ माहीत आहे. एक सर्वसामान्य कार्यकर्ता या समाजासाठी लढत आहे. मी मुख्यमंत्री असताना त्यांना दोन वेळा भेट दिली. आता देखील आमचे मंत्री त्यांच्या भेटीसाठी गेले आहेत. मराठा समाजाला न्याय मिळाला पाहिजे, मराठा समाजासाठीचा लढा हा अनेक वर्षांपासून सुरू आहे. अण्णा साहेब पाटील यांचे आंदोलन तुम्हाला माहीत असेल. मात्र मराठा समाजाला न्याय देण्याचे काम सुरुवात कधी झाली असेल तर महायुतीचे सरकार 2014 साली आले आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोणाचेही आरक्षण कमी न करता 12-13 टक्के आरक्षण देण्याचे काम केले होते.

# कुंभमेळ्यावर आधारित छायाचित्र प्रदर्शनाचे मुख्यमंत्री यांच्या हस्ते उद्‌घाटन



■ नाशिक (दै. संध्या)

नाशिक त्र्यंबकेश्वर येथे दर १२ वर्षांनी भरणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यावर आधारित छायाचित्र प्रदर्शनाचे उद्‌घाटन आज सायंकाळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यानंतर त्यांनी या प्रदर्शनाची पाहणी केली.

रोटरी क्लब ऑफ नाशिक नाईन हिल्स आणि नाशिक प्रेस फोटोग्राफर्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुदक्षिणा हॉलमधील डॉ. सुनंदा म.गोसावी आर्ट गॅलरीत आजपासून छायाचित्र प्रदर्शन सुरू झाले. 30 ऑगस्ट, 2026 पर्यंत नागरिकांसाठी खुले राहणार आहे.

उद्‌घाटन सोहळ्यास राज्याचे जलसंपदा, आपत्ती व्यवस्थापन तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन, महापौर हिमगौरी आडके, आमदार सरोज अहिरे, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, महंत भक्ती चरणदास महाराज यांच्यासह रोटरी क्लब ऑफ नाशिक नाईन हिल्सचे अध्यक्ष अभय नेरकर, सचिव हर्षद बेळे, कार्यकारी सचिव अभिषेक व्यास, नाशिक प्रेस फोटोग्राफर्स असोसिएशनचे अध्यक्ष सतीश काळे, सचिव प्रशांत खरोटे, सतीश देवगिरे, अशोक गवळी, नीलेश तांबे, अंबादास शिंदे, हेमंत घोरपडे, विवेक बोकील, भूषण पाटील आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर, नागरिक उपस्थित होते. या प्रदर्शनात सिंहस्थ कुंभमेळ्यांतील दुर्मिळ, अप्रकाशित छायाचित्रे मांडण्यात आली आहेत. सन १९३२ पासूनच्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या ऐतिहासिक आठवणींचा अमूल्य ठेवा या छायाचित्रांमधून उलगडण्यात आला आहे. बदलते नाशिक, साधू-संतांचे आखाडे, शाही स्नानाची परंपरा, भाविकांचा महासागर, धार्मिक विधी, तत्कालीन सामाजिक जीवन, कुंभमेळ्याचे बदलते स्वरूप या छायाचित्रांतून पाहावयास मिळणार आहे.

## थोडक्यात...

### ६९ नागरिक ३१ ऑगस्टपर्यंत पोहोचणार

मुंबई : दैनिक संध्या

महाराष्ट्रातील ६९ नागरिकांनी काल सायंकाळी उशिरा कोदारी इमिग्रेशन केंद्रावरून चीनची सीमा ओलांडून नेपाळमध्ये प्रवेश केला आहे. प्राप्त माहितीनुसार संबंधित नागरिक सोमवार, ३१ ऑगस्टपर्यंत मुंबईत पोहोचणार आहेत. आपत्तीग्रस्त भागात अडकलेल्या ४०४ नागरिकांची राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडे (एसइओसी) नोंद झाली आहे. त्यापैकी महाराष्ट्रातील २६२ पर्यटक अजूनही नेपाळ किंवा चीनमध्ये होते. यापैकी ६९ नागरिकांना सुखरूप परत आणण्यात यश आले आहे. यापूर्वी १४२ नागरिक मायदेशी परत आले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सक्रिय पाठपुरावा आणि आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांचे अचूक मार्गदर्शन यामुळे एसइओसीद्वारे सुविधा व मदतीसाठी नियोजनबद्ध प्रयत्न केले जात आहेत. नेपाळमधील महापुराच्या आपत्तीमुळे अडकलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांच्या मदतीसाठी राज्य आपत्कालीन कार्य केंद्रामार्फत परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या (एमईए) नियंत्रण कक्षाशी समन्वय साधण्यात येत आहे. तसेच, चीन, तिबेट आणि नेपाळमधील आपत्तीग्रस्त भागात गेलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांची माहिती संबंधित यंत्रणांना पाठविण्यात येत आहे. या आधारे पूरग्रस्त भागात बचाव पथके तैनात करून शोध सुरू आहे. आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल आणि संचालक भालचंद्र चव्हाण कार्यवाहीवर लक्ष ठेवून आहेत.

### ४०४ नागरिक सुरक्षित; ३३८ जण संपर्कात

मुंबई : दैनिक संध्या

नेपाळ येथील महापुरामध्ये अडकलेले महाराष्ट्रातील नागरिक व धार्मिक पर्यटनासाठी गेलेल्या पर्यटकांच्या मदतीसाठी विविध पातळीवर शासकीय यंत्रणा अहोरात्र प्रयत्न करत आहेत. सर्वजण सुरक्षितपणे त्यांच्या गावी परत पोहोचण्यासाठी सतर्कतेने योग्य नियोजन करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. सागा येथून ४१ जण आज परतले असून १०६ जण नागपूरला उद्या पहाटे ४:३० वाजता पोहोचतील. जवळपास १४३ नागरिक राज्यात यशस्वी व सुरक्षितरित्या परतण्याच्या मार्गावर असून नेपाळमध्ये निर्माण झालेल्या पूरस्थितीमुळे महाराष्ट्रातील नागरिकांसाठी हेल्पलाईन क्रमांक जारी करण्यात आले आहेत. मंत्रालयातील नियंत्रण कक्षात २४ तास हा कक्ष कार्यरत असून महाराष्ट्रातील नागरिकांसाठी सहाय्यता व मदतकार्य समन्वय साधला जात आहे. राज्यातील ४५ जणांच्या पर्यटकांच्या ग्रुपने आज भारतीय हद्दीत प्रवेश केला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर येथील ट्रॅव्हल्सच्या माध्यमातून नाशिक, पुणे, मुंबई व अहिल्यानगर येथील नागरिक नेपाळ येथे गेले होते. महापुराच्या घटनेच्या कालावधीत हे नागरिक चितवन येथे होते. आज काठमांडूकडे जाणारे मार्ग बंद असल्याने नेपाळमधील लुंबिनी मार्गे त्यांना आणण्यात येत असून आज अयोध्या पोहोचल्यानंतर पुढील नियोजन शासनाच्या सूचनेनुसार केले जाणार आहे. आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन सूचनानुसार महाराष्ट्र शासन तसेच केंद्र सरकारच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या माध्यमातून आवश्यक मदत देण्यासाठी कार्यवाही केली जात आहे. आत्तापर्यंत प्राप्त माहितीनुसार राज्यातील ४०४ नागरिक सुरक्षित असून ३३८नागरिकांशी संपर्क झाला आहे. परराष्ट्र मंत्रालयाकडून काल २८ ऑगस्ट अखेरपर्यंत चीनमधून नेपाळमध्ये सुरक्षितरित्या प्रवेश केलेल्या १४९ भारतीय पर्यटक नागरिकांची यादी राज्यांना पाठवण्यात आली आहे.

# समृद्धी महामार्गावरील टाकळीवाडी येथे गॅस वाहिनीला गळती

■ छत्रपती संभाजीनगर (दै. संध्या)

■ प्रशासनाकडून उपायोजना सुरु; वाहतूक धुळे - सोलापूर महामार्गावरून वळवली




समृद्धी महामार्गालगत टाकळीवाडी (ता. गंगापूर) येथे गेल कंपनीच्या गॅस वाहिनीला गळती लागली असून खबरदारीचा उपाय म्हणून समृद्धी महामार्गावरील साखळी क्रमांक ४४७ ते ४७० दरम्यानची (३० किमी अंतर-हडस पिंपळ गाव ते माळीवाडा) वाहतूक धुळे – सोलापूर महामार्गावरून वळविण्यात आली आहे, असे जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी कळविले आहे. आज सायं. ५ वा. सुमारास टाकळीवाडी येथे गेल कंपनीच्या गॅस वाहिनीला गळती लागली. या घटनेची प्रशासनाने तात्काळ दखल घेत, त्वरित उपाययोजना सुरु केल्या. घटनास्थळी तात्काळ गेल कंपनीच्या अधिकाऱ्यांना पाचरण करण्यात आले. तसेच अग्निशमन यंत्रणा सज्ज करण्यात आली. तथापी, खबरदारी म्हणून समृद्धी महामार्गावरील साखळी क्रमांक ४४७ ते ४७० दरम्यान ३० किमी वरील वाहतूक धुळे – सोलापूर महामार्गावरून वळवण्यात आली आहे. मुंबईकडून जाणारी वाहने हे हडस पिंपळगाव इंटरचेंजवरून उतरून धुळे – सोलापूर महामार्गावर जातील व माळीवाडा येथून पुन्हा समृद्धी महामार्गावर येतील. नागपूरकडून येणारी वाहने माळीवाडा इंटरचेंजवरून धुळे – सोलापूर महामार्गावर येतील व हडस पिपंळगाव येथून पुन्हा समृद्धी महामार्गावर येतील. रहदारी धुळे – सोलापूर महामार्ग वरून वळविण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला असल्याचे जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी सांगितले. दरम्यान गेल कंपनीच्या तज्ज्ञांनी दोन्हीही बाजूकडील व्हॉलव्ह बंद केले असून पाईपलाईन मधील दाब कमी होत आहे. लवकरच रहदारी सुरळीत होईल, यासाठी प्रशासन अथक प्रयत्न करीत असून जिल्हाधिकारी व पोलीस दलाचे वरिष्ठ अधिकारी लक्ष ठेवून आहेत. अधिक माहितीसाठी समृद्धी महामार्ग नियंत्रण कक्ष क्रमांक 1800 233 22 33 व 8181818155 वर संपर्क साधता येईल, असेही कळविण्यात आले आहे.

# डॉ. चित्तरंजन पुरंदरे यांचे वैद्यकीय क्षेत्रातील योगदान प्रेरणादायी – भुजबळ

### प्रा. डॉ. पुरंदरे यांचा गौरव सोहळा व ‘हँड्स दॅट हील्ड, अ हार्ट दॅट लेड’ आत्मचरित्राचे प्रकाशन

■ मुंबई (दै. संध्या)




वैद्यकीय क्षेत्रात पाच दशकांहून अधिक काळ निःस्वार्थ सेवा बजावताना हजारो रुग्णांचे प्राण वाचविणारे, हजारो विद्यार्थ्यांना घडविणारे आणि वैद्यकीय संशोधनाला नवी दिशा देणारे डॉ. चित्तरंजन पुरंदरे यांचे कार्य आंतरराष्ट्रीय स्तरावर ख्यातीप्राप्त आहे. महिला आरोग्य आणि प्रसूतीशास्त्राच्या क्षेत्रात त्यांनी केलेले विशेष कार्य, संशोधन आणि अध्यापन यामुळे वैद्यकीय क्षेत्राची प्रतिष्ठा उंचावली आहे. त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी आयोजित सत्कार सोहळा आणि त्यांच्या आत्मचरित्राचे प्रकाशन हा अभिमानाचा क्षण असल्याचे गौरवोद्गार अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी काढले.

महिलांच्या आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय सेवा बजावणारे प्रा. डॉ. सी. एन. पुरंदरे यांचा कार्य गौरव सोहळा मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे झाला. कार्यक्रमास कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, खासदार सुप्रिया सुळे यांच्यासह वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर व डॉ. पुरंदरे यांचे कुटुंबीय उपस्थित होते. मंत्री छगन भुजबळ म्हणाले, डॉ. पुरंदरे हे केवळ उत्कृष्ट चिकित्सक नसून शिक्षक आणि संशोधक म्हणूनही त्यांनी भरीव योगदान दिले आहे. आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये त्यांचे १४० हून अधिक संशोधनपर लेख प्रसिद्ध झाले आहेत. आत्मचरित्र म्हणजे केवळ कामांची यादी नसून एका काळाचा इतिहास असतो. ज्ञान, संशोधन आणि कौशल्यांचा उपयोग समाजसेवेसाठी झाला पाहिजे, असा प्रेरणादायी संदेश देणारा डॉ. पुरंदरे यांचा जीवनप्रवास तरुणांसाठी मार्गदर्शक ठरणार असल्याचे मंत्री भुजबळ म्हणाले. प्रा. डॉ. पुरंदरे यांनी वैद्यकीय क्षेत्रात केलेले कार्य हे केवळ उपचारांपुरते मर्यादित नसून, महिला आरोग्याबाबत समाजात जागरूकता निर्माण करणारे असल्याचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले. त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा आणि सेवाभावी वृत्तीचा लाभ असंख्य रुग्णांना झाला असून, नव्या पिढीतील वैद्यकीय विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्यातून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले म्हणाले डॉ. पुरंदरे यांनी त्यांच्या कामातून जगभरात ओळख निर्माण केली. त्यांच्या आत्मचरित्रातून त्यांच्या जीवनाचे विविध पैलू समोर येतील असे सांगत त्यांनी पुरंदरे कुटुंबाशी असलेल्या ऋणानुबंधांना उजाळा दिला. खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या, प्रा. डॉ. पुरंदरे यांचे योगदान आरोग्य क्षेत्रासाठी अभिमानाची बाब आहे. स्त्रियांच्या आरोग्यासाठी काम करताना रुग्णसेवा, वैद्यकीय शिक्षण आणि सामाजिक बांधिलकी याचा त्यांनी समन्वय साधला. महिलांच्या आरोग्याकडे संवेदनशीलतेने पाहण्याची दृष्टी समाजात रुजविण्यात त्यांचे मोठे योगदान आहे.

महिलांच्या आरोग्यसेवेसाठी काम करण्याची संधी मिळणे, तरुण डॉक्टर घडवणे आणि मातामृत्यू रोखण्याच्या प्रयत्नांत योगदान देता येणे, हीच आपल्या कारकीर्दीतील समाधानाची बाब आहे. गर्भाशयातील उपचारपद्धती, गर्भशस्त्रक्रिया तसेच गर्भाशयमुखाच्या कर्करोगावरील शस्त्रक्रियात्मक उपचारांत नवे प्रयोग केले.

# जरांगे पाटलांना भेटणार, २४ तासात योग्य निर्णय घेणार

### *सरकार मराठा समाजाच्या मागण्यांसोबत, उदय सामंतांचं मोठं वक्तव्य*

■ मुंबई (दै. संध्या)



मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचे अंतरवाली सराटीत आमरण उपोषण सुरु झाले आहे. आज त्यांच्या उपोषणाचा दुसरा दिवस आहे. दरम्यान, यावर राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मनोज जरांगे पाटील यांची उद्या किंवा परवा मी भेट घेणार आहे. पुढच्या 24 तासात योग्य निर्णय घेऊ असं मोठं वक्तव्य मंत्री उदय सामंत यांनी केलं आहे. शासन मराठा समाजाच्या मागण्यांसोबत आहे. मागण्या पूर्ण व्हाव्यात यासाठी मी जरांगे यांच्या संपर्कामध्ये असल्याचे सामंत म्हणाले.

माझे मित्र म्हणून, तसेच आमचे संबंध राजकारणाच्या आंदोलनाच्या पलीकडचे आहेत. म्हणूनच मी त्यांना विनंती करेन कोणाच्या गैरसमजा मधून एकनाथ शिंदे बद्दल वाईट बोलू नये. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बद्दल देखील वाईट बोल नये. त्यांनी गैरसमज दूर करावा असे सामंत म्हणाले. शासन मराठा समाजाच्या मागण्यांसोबत आहे. मागण्या पूर्ण व्हाव्यात यासाठी मी जरांगे यांच्या संपर्कामध्ये आहे असेही सामंत म्हणाले.

मनोज जरागे यांचा उपोषणाचा कार्यक्रम आहे म्हणून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा मेळावा आयोजित केलेला होता, असा जर जरांगे यांचा गैरसमज झाला असेल तर तो साफ चुकीचा आहे. दोन महिन्यांपासूनच हा युवा संवाद आणि शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आला होता. सात जुलैला हा कार्यक्रम होता मात्र एकनाथ शिंदे आजारी असल्यामुळे त्या दिवशी हा कार्यक्रम होऊ शकला नाही. कुणालाही काउंटर करण्यासाठी एकनाथ शिंदे यांचा हा कार्यक्रम नव्हता असे सामंत म्हणाले. मराठा आरक्षणाच्या संदर्भात शंका निर्माण करण्यासाठी हा कार्यक्रम घेतला नव्हता. मराठी समाजाला कमी लेखण्याचा प्रयत्न शेतकरी मेळाव्यामधून झालेला नाही असेही सामंत म्हणाले. मनोज जरांगे यांनी खासदार जाधव यांना फोन केला त्यावेळेला हजारो लोक जमले होते. शिंदे साहेबांना हा मेळावा करावा लागल्याचे सामंत म्हणाले. एकनाथ शिंदे यांचा मला काल फोन आला होता. त्यावेळी एकनाथ शिंदेंनी मला सांगितलं आंदोलनं होत राहतील, मागण्या देखील मान्य होतील. परंतू जरांगे यांनी आपल्या प्रकृतीची देखील काळजी घेतली पाहिजे असे सामंत म्हणाले. असं सांगणार नेतृत्व हे शिवसेनेचे नेतृत्व आहे. त्यामुळं जरांगे यांचा गैरसमज निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो, तो खोटा आहे. जरांगे यांनी शिंदे यांच्या बाबतीतला गैरसमज दूर करावा. एकनाथ शिंदे यांची भूमिका मराठा समाजाला आरक्षण देणारी ठरली आहे असेही सामंत म्हणाले. खासदार संजय जाधव यांनी देखील वेळोवेळी मनोज जरांगे यांचे समर्थन केलं आहे. एकनाथ शिंदे जरांगे यांच्या प्रकृतीची काळजी घेतात, ते मराठा आरक्षणात अडचण यावं अशी भूमिका कधीच घेणार नाहीत, याची खात्री मनोज जरांगेंनी बाळगावी असे सामंत म्हणाले.

**मराठा आरक्षणाच्या मुद्यावरुन राज्यातील वातावरण पुन्हा एकदा तापलं आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी कालपासून आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. मागण्या मान्य झाल्याशिवाय मागे हटणार नाही, असी भूमिका त्यांनी घेतलीय. दरम्यान, त्यांच्या या आंदोलनासंदर्भात कॉकरोच जनता पार्टीचे प्रमुख अभिजीत दिपके यांनी प्रतिक्रिया दिली आहे. जर सरकारने समाजाच्या मुलांना चांगलं शिक्षण दिलं असतं आणि रोजगाराचे संधी दिली असती तर मनोज जरांगे सरांना आंदोलन करावं लागलं असतं का? असा सवाल दिपकेंनी उपस्थित केला. हे सरकारचे अपयश आहे, आज राज्यात सगळेजण आंदोलन करत आहेत असे दिपके म्हणाले.**

# ‘कलरिंग बुक’चे मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते लोकार्पण

■ मुंबई (दै. संध्या)



न्याय संस्था आणि विधी सेंटर फॉर लीगल पॉलिसी यांच्यावतीने बालकांना त्यांच्या संविधानिक हक्कांची माहिती सहज, आनंददायी पद्धतीने मिळावी, यासाठी ‘प्रत्येक बालकाने जाणून घ्यावेत असे 18 मूलभूत हक्क’ हे बुक तयार करण्यात आले आहे. या कलरिंग बुकचे लोकार्पण महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्स (एनसीपीए), मुंबई येथे आयोजित कार्यक्रमास मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती भारती डंगरे, माजी न्यायमूर्ती आर. सी. चव्हाण, अनिशा गोपी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी संस्थेच्या वतीने राज्यात संविधान फेलोशिपचाही शुभारंभ करण्यात आला. बालकांच्या हक्कांची माहिती त्यांना लहान वयापासूनच व्हावी, या उद्देशाने तयार करण्यात आलेले हे कलरिंग बुक मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या बुकमध्ये निवारा, पोषण, शिक्षण आणि मोफत कायदेशीर मदत यांसह बालकांच्या 18 महत्त्वपूर्ण हक्कांची माहिती देण्यात आली आहे. तसेच बालविवाह, बालमजुरी, रॅगिंग, बुलिंग आणि लैंगिक शोषण या विषयांचाही बालकांना समजेल अशा संवेदनशील पद्धतीने समावेश करण्यात आला आहे.

# संपादकीय

## पदवी हातात, रोजगाराची प्रतीक्षा किती?

शिक्षण हे माणसाच्या आयुष्याला दिशा देणारे सर्वात प्रभावी साधन मानले जाते. पालक आपल्या मुलांनी शिकावे, मोठे व्हावे आणि चांगले करिअर घडवावे, यासाठी आयुष्यभर कष्ट घेतात. विद्यार्थीही अनेक वर्षे अभ्यास करून पदवी मिळवतात. मात्र पदवी हातात आल्यानंतरही नोकरीची हमी मिळत नाही, ही आजच्या तरुणाईसमोरील सर्वात मोठी शोकांतिका आहे. दरवर्षी हजारो तरुण विविध शाखांमधून पदवी, पदव्युत्तर पदवी आणि व्यावसायिक शिक्षण पूर्ण करून बाहेर पडतात. त्यांच्या हातात प्रमाणपत्र असते; मात्र रोजगाराच्या बाजारात आवश्यक असलेले कौशल्य, अनुभव आणि संधी यांचा ताळमेळ अनेकदा दिसत नाही. परिणामी, उच्चशिक्षित तरुणही छोट्या-मोठ्या नोकऱ्यांसाठी मोठ्या प्रमाणावर अर्ज करताना दिसतात. प्रश्न केवळ बेरोजगारीचा नाही, तर शिक्षण आणि रोजगार यांच्यातील वाढत्या दरीचा आहे. आज उद्योगक्षेत्राला डिजिटल कौशल्य, तांत्रिक ज्ञान, संवादकौशल्य, समस्या सोडवण्याची क्षमता आणि प्रत्यक्ष कामाचा अनुभव असलेले मनुष्यबळ हवे आहे. दुसरीकडे, अनेक शिक्षणसंस्थांमध्ये अजूनही केवळ परीक्षाकेंद्रित शिक्षणावर भर दिला जातो. विद्यार्थ्याला पदवी मिळते; पण प्रत्यक्ष उद्योगात काम करण्यासाठी आवश्यक असलेली तयारी कितपत होते, याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.

सरकारकडून रोजगारनिर्मितीच्या घोषणा केल्या जातात. विविध योजना, कौशल्य विकास कार्यक्रम आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे प्रयत्नही होत आहेत. मात्र या योजनांचा लाभ शेवटच्या तरुणापर्यंत किती पोहोचतो, याचे मूल्यमापन आवश्यक आहे. रोजगाराच्या आकडेवारीपेक्षा स्थिर, सन्मानजनक आणि पुरेसे उत्पन्न देणाऱ्या रोजगाराच्या संधी निर्माण होणे अधिक महत्त्वाचे आहे. तरुणांना केवळ सरकारी नोकरीच्या प्रतीक्षेत ठेवणे हा देखील उपाय नाही. प्रत्येक तरुणाला सरकारी नोकरी मिळणे शक्य नाही. त्यामुळे उद्योग, स्टार्टअप, लघुउद्योग, सेवा क्षेत्र, शेतीपूरक व्यवसाय आणि स्वयंरोजगार यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील तरुणांसाठी स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती झाली तर शहरांकडे होणारे मोठ्या प्रमाणातील स्थलांतरही कमी होऊ शकते. यासाठी शिक्षणसंस्थांनीही आपली भूमिका बदलली पाहिजे. 'पदवी देणे' एवढेच शिक्षणाचे उद्दिष्ट नसून 'रोजगारक्षम बनवणे' हेही शिक्षणाचे



महत्त्वाचे उद्दिष्ट असले पाहिजे. महाविद्यालयांमध्ये उद्योगांशी थेट संपर्क, इंटर्नशिप, अप्रेंटिसशिप, कौशल्य प्रशिक्षण आणि करिअर मार्गदर्शनाची व्यवस्था मजबूत केली पाहिजे.

तरुणाई ही देशाची सर्वात मोठी ताकद आहे. ही ताकद योग्य दिशेने वापरली गेली तर देशाची अर्थव्यवस्था अधिक मजबूत होऊ शकते. पण हातात पदवी असूनही वर्षानुवर्षे नोकरीच्या प्रतीक्षेत असलेला तरुण निराश झाला, तर त्याचा परिणाम केवळ एका कुटुंबावर होत नाही; त्याचा परिणाम संपूर्ण समाजावर होतो. म्हणून आता प्रश्न 'तरुणांनी आणखी किती शिकावे?' हा नसून 'शिक्षणाला रोजगाराशी कसे जोडावे?' हा असला पाहिजे. देशाला केवळ पदवीधरांची संख्या वाढवायची नाही, तर कुशल, आत्मनिर्भर आणि रोजगारनिर्माते तरुण घडवायचे आहेत. रोजगार हा उपकार नसून तरुणांचा अधिकार आणि अर्थव्यवस्थेच्या विकासाची गरज आहे. त्यामुळे शिक्षण, कौशल्य आणि रोजगार यांचा मजबूत सेतू उभारणे ही आजची सर्वात मोठी राष्ट्रीय गरज आहे.

## संस्कृत सुभाषित

व्यायामः स्थैर्यकराणाम्

अर्थ : शरीराला स्थैर्य आणणे म्हणजे शरीर बळकट आणि मजबूत करणे. शरीर बळकट असेल तर दीर्घायुष्य मिळते. त्यातून शरीराला स्थैर्य मिळते.

## आगामी साप्ताहिकी

३१ ऑगस्ट २०२६ सोमवार
श्रावणी सोमवर शिवपूजन
शिवामूठ : मूग
संकष्ट चतुर्थी चंद्रोदय ८.४६
पांडवलेणी यात्रा – पाथर्डी (नाशिक)

१ सप्टेंबर २०२६ मंगळवार
मंगळागौरी पूजन
पलसिद्धस्वामी पुण्यतिथी – साखरखेर्डा (बुलढाणा)

२ सप्टेंबर २०२६ बुधवार
बुधपूजन

३ सप्टेंबर २०२६ गुरुवार
बृहस्पती पूजन

४ सप्टेंबर २०२६ शुक्रवार
कालाष्टमी
जरा – जिवंतिका पूजन
श्रीकृष्ण जयंती (उपवास)
पंत महाराज बालेकुंद्री जन्माष्टमी
श्री ज्ञानेश्वर महाराज जयंती – आपेगांव (छ.संभाजीनगर)
महर्षी नवल जयंती – पुणे
गुलाबबाबा यात्रा – काटेल (बुलढाणा)

## उपदेशकथा

### युक्ती

एकदा एका सिंहाने आणि गाढवाने भागीदारीत शिकार करण्याचे ठरवले. हिंडता हिंडता ते रानटी मेंढराच्या एका गुहेपाशी आले. सिंह गाढवाला म्हणाला, 'आपण असे करूया, मी गुहेच्या बाहेर उभा राहतो. तू आत जाऊन जोरजोरात ओरडायला सुरुवात कर. सगळ्या रानटी मेंढ्या घाबरून बाहेर येतील आणि मग मी त्यांचा फडशा पाडतो', असे म्हणून सिंह बाहेर गुहेच्या दारापाशी पाळतीवर राहिला.

गाढवालाही सिंहाची युक्ती पटली आणि त्याने आत घुसून मोठ्याने खिंकाळण्यास सुरुवात केली. रानटी मेंढ्या गाफील होत्या, त्यांना असा हल्ला अपेक्षितच नव्हता. नंतर त्याने आत जोरदार गोंधळ माजविला की, त्यामुळे सर्व मेंढरे बाहेर पडली आणि आयतीच सिंहाच्या तावडीत सापडली. सिंहाने बहुतेक सर्वांना पकडून मारले.

शेवटी गाढव बाहेर आला आणि दमून धापा टाकत सिंहाला म्हणाला, काढलं की नाही सगळ्यांना बाहेर? कसं काय वठलं नाटक?' 'अरे, विचारतोस काय?' सिंह खो खो हसत म्हणाला, 'खरं सांगायचं म्हणजे तू गाढव आहेस, हे मला माहीत नसते तर स्वत: मीसुद्धा तुला घाबरलो असतो पण यातील मांसाचा एकही तुकडा तुला मिळणार नाही आणि जास्त बोलशील तर तुलाही खाऊन टाकेन. जा इथून.' गाढवाला कळून चुकले की पोकळ बढाया कुठेही चालत नाहीत. त्यामुळे नुसती दामछाक होते.

कथा उपदेश : खोट्या बढायांनी काही साध्य होत नाही, तर फजितीच होते.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | करण:विष्टि ०८:५१:२२ |
| ३१ ऑगस्ट २०२६ | करण:बव २०:१९:२९ |
| सोमवार | सूर्य:सिंह |
| विक्रम संवत्– २०८२ | चन्द्र:मीन |
| श्रावण शके | हिजरी सन् – १४४८ |
| संवत्– १९४८ | मुस्लिम मास – रबिलावल |
| संवत्सर – पराभवनाम | तारीख – १७ |
| अयन– दक्षिणयन | विशेष |
| मास– श्रावण | श्रावणी सोमवर शिवपूजन |
| ऋतु– सौर शरद | शिवामूठ : मूग |
| कृष्ण पक्ष | संकष्ट चतुर्थी |
| तिथि:तृतीया ०८:५१:२२ | चंद्रोदय ८.४६ |
| नक्षत्र:रेवती २७:२३:३०+ | पांडवलेणी यात्रा – |
| योग:गण्ड २५:५०:१२+ | पाथर्डी (नाशिक) |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०५५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 5 | 7 | 8 | | | | | 1 |
| | | | 6 | | | | 5 | 3 |
| 6 | | 1 | | 7 | | | | 2 |
| | 6 | 5 | | 8 | | 1 | 7 | |
| | 7 | | | | | | 6 | |
| | 3 | 8 | | 4 | | 2 | 9 | |
| 5 | | | | 3 | | 4 | | 7 |
| 2 | 9 | | | | 7 | | | |
| 7 | | | | | 1 | 5 | 3 | 9 |

**: सूडोकु :**

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोड्याचे केवळ एकच उत्तर आहे.या कोड्याला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. १०५४ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 5 | 7 | 9 | 1 | 4 | 6 | 2 | 3 |
| 9 | 2 | 1 | 5 | 6 | 3 | 8 | 4 | 7 |
| 3 | 6 | 4 | 8 | 7 | 2 | 9 | 1 | 5 |
| 4 | 9 | 8 | 7 | 2 | 6 | 5 | 3 | 1 |
| 1 | 3 | 5 | 4 | 8 | 9 | 2 | 7 | 6 |
| 2 | 7 | 6 | 3 | 5 | 1 | 4 | 8 | 9 |
| 6 | 1 | 9 | 2 | 4 | 7 | 3 | 5 | 8 |
| 7 | 8 | 2 | 6 | 3 | 5 | 1 | 9 | 4 |
| 5 | 4 | 3 | 1 | 9 | 8 | 7 | 6 | 2 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९३९ – हिटलरने पोलीश प्रतिनिधीशी बोलण्याचे नाटक केले. ही बोलणी काही मिनिटेच टिकली. नंतर हिटलरने पोलंडला समझोता करायची इच्छाच नाही, असे जाहीर केले.
- १९६३ – रशिया व अमेरिका या देशांदरम्यान हॉट लाईन सुरु करण्यात आली.

### राष्ट्रीय

- १७९१ – घाशीराम सावळाराम या पुण्याच्या कोतवालाची हत्या.
- १९६५ – भारत–पाकिस्तान युद्धाची सुरुवात.
- २००४ – गुरू ग्रंथसाहेब ४०० वर्षांचे झाले.
- २००६ – गंगा नदीत नाव बुडून २० जण ठार झाले.


### जन्म

- ००१२ – कालिगुला, रोमन स्राट.
- ०१६१ – कोमॉडस, रोमन स्राट.
- १८४३ – जॉर्ज फोन हर्टलिंग,जर्मनीचा चान्सेलर.
- १८७० – मारिया मॉँटेसोरी, इटालियन शिक्षणतज्ञ.
- १८८० – विल्हेमिना पहिली, नेदरलँडची राणी.
- १९०७ – रमोन मॅग्सेसे, फिलिपाईन्सचा राष्ट्राध्यक्ष.
- १९१९ – अमृता प्रीतम, प्रासिद्ध लेखिका,ज्ञानपीठ पुरस्कारविजेत्या.

### निधन

- १०५६ – थियोडोरा, बायझेन्टाईन स्राज्ञी.
- १२३४ – गो–होरिकावा जपानी स्राट.
- १४२२ – हेन्री पाचवा, ईंग्लंडचा राजा.
- १८१४ – आर्थर फिलिप, ब्रिटीश आरमारी अधिकारी.
- १९७९ – ई.जे. स्मिथ ईंग्लिश क्रिकेट खेळाडू.
- १९७३ – ताराबाई मोडक, बालशिक्षणतज्ज्ञ.
- १९८६ – उर्हो केक्कोनेन फिनलंडचा राष्ट्राध्यक्ष.

## : SMS :



Pappu shaadi me gaya, dulhe se bola - Bhai tu to lucky hai, teri biwi ghar ka kaam karegi
Dulha - Bhai pehle apni biwi se to

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३०.२ | २२.१ |
| अहमदनगर | ३०.७ | २२.३ |
| अकोला | ३३.१ | २४.२ |
| अमरावती | ३१.७ | २५ |
| बीड | ३५.९ | २६.३ |
| भंडारा | ३०.८ | २४.८ |
| बुलढाणा | ४३.८ | ३०.७ |
| चंद्रपूर | ३६.३ | २६.२ |
| चेन्नई | ४१.५ | ३०.१ |
| नवी दिल्ली | ४६ | ३५.३ |
| धुळे | ३३.६ | २४.८ |
| गोंदिया | ३१.३ | २५.६ |
| जळगाव | ३५.३ | २५.२ |
| कोल्हापूर | २९.५ | २२.२ |
| लातूर | ३०.६ | २२ |
| मुंबई | ३५ | २९.१ |
| नागपूर | ३२ | २५ |
| नांदेड | ३४.७ | २५.१ |
| नंदूरबार | ३१ | २४.२ |
| नाशिक | ३० | २३.३ |
| पुणे | २७.१ | २२ |
| पंढरपूर | ३४.२ | २३.५ |
| सातारा | ३०.८ | २२.५ |
| सांगली | ३१.९ | २३ |
| सोलापूर | ३४.३ | २३.७ |
| वर्धा | ३५.२ | २६.१ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : दक्षिण प्रतिष्ठा वाढेल. सहकार्यांच्या अपेक्षा पूर्ण कराल.

**वृषभ :** शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : पूर्व कर्जात कपात होईल. कामातील अडथळे दूर होतील. नवीन कामे जुळून येतील.

**मिथुन :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा : पूर्व स्पष्ट धोरणांमुळे अनुकूलता येईल. जीवनात आशाजनक स्थिती निर्माण होईल.

**कर्क :** शुभ रंग : केसरी, शुभ दिशा : पश्चिम नशीब साथ देणार नाही. आपल्या मनमोकळेपणाचा फायदा दुसरे लोक घेतील.

**सिंह :** शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा : पश्चिम कामे यशस्वी होतील. शारीरिक आरोग्य उत्तम राहिल. मित्रांचे संपूर्ण सहकार्य लाभेल.

**कन्या :** शुभ रंग : निळा, शुभ दिशा : पश्चिम नवीन संबंधांचा फायदा होईल. कामे होणार नाही. आरोग्याची काळजी घ्या.

**तुळ :** शुभ रंग : जांभळा, शुभ दिशा : पूर्व पैसे हातात येतील. एखाद्याच्या सहकार्याने कामात यश मिळेल.

**वृश्चिक :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : पश्चिम खर्चाची कामे होतील. जुन्या कामातील अडथळे दूर होतील. मित्रांचे सहकार्य लाभेल.


**धनु :** शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा : पूर्व कौटूंबिक समस्यांचे समाधान होईल. एखाद्या महापुरुषाशी भेट होईल. आर्थिक स्थिती खालावलेली असेल.

**मकर :** शुभ रंग : केसरी, शुभ दिशा : दक्षिण मुलांमुळे तनाव निर्माण होऊ शकतो. एखाद्या वादावर तोडगा निघेल.

**कुंभ :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा : दक्षिण प्रयत्न अयशस्वी झाल्याने मन दु:खी होईल. एखाद्या जवळच्याच्या व्यवहारात प्रतिकूलता येईल.

**मीन :** शुभ रंग : काळा, शुभ दिशा : पूर्व नशीबाची पूर्ण साथ मिळेल. अधिकारीवर्गाचे सहकार्य मिळेल. कामात दिरंगाई केल्यास नुकसान सोसावे लागेल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०५५



### आडवे शब्द

१. धूर्त, लबाड
४. भेग, चीर
७. शंकराचे एक नाव
१०. शहर
११. सोसाट्याचा वारा
१२. कलावंत
१३. आशीर्वाद देणारा
१५. शाब्दिक चकमक
१७. ओटा, कट्टा
१८. अज, २०. काटेरी आंबटगोड फळ
२१. वटवट, त्रास
२३. अंतरिक्ष
२४. शंभर पैशांचे नाणे
२६. घेतलेले रूप, मुखवटा
२७. द्रव्य, पैसा
२८. चांदण्याचा ऋतू
३०. हावरटपणा
३२. भीती
३३. कुबेराचा सेवक
३४. स्तुती करणारा
३६. विशेष
३८. पुष्परस
३९. मोठा शिस्तीचा
४१. घामाघूम होणे
४३. नजरफेक
४५. यात्रेस जाणे
४६. सोन्याचा धागा
४७. रेशमी धोतर
४८. महिरप
५०. कमनीय
५२. बारीकसारीक माहितीसह
५४. मनाचा ओढा
५५. पाने कुरतडणारी
५६. मोठी उथळ वाटी
५८. साखरेची फुगीर वडी
५९. दुर्दशा
६२. मदत
६३. अधिकार, अम्मल
६४. सिद्धता
६५. पांढरपेशा
६७. पांढराशुभ्र प्राणी
६८. क्षमाशील
७०. थोडे, मित
७१. नवरा
७२. शपथ
७३. वात्रट
७६. उद्धट, गर्विष्ठ
७७. परवशता

### उभे शब्द

१. कर्णेंदिय
२. गतिमान
३. पोते
४. हाक
५. सुटकेचा मार्ग
६. कर्नाटकातील सोन्याच्या खाणीचे गाव
७. देशी शीतपेय
८. शिव्यांनी युक्त
९. नवरदेव
११. खटला दाखल करणारा
१२. अलमारी, दरवाजा
१४. रावण
१६. गाईंचे पिल्लू
१९. युक्ती
२०. पुष्कळ
२१. अंदाज, तर्क
२२. शिखराचे टोक
२३. सदऱ्याचा लांबलचक प्रकार
२५. बदल
२६. हत्तीचे नाक
२७. जलप्रपात
२९. संरक्षण करणारा
३१. मध्यस्थ
३४. ज्वारीची चपाती
३५. पोट
३७. कायदेशीर
३८. अंत:करण
४०. डोंगराची उतरण
४१. नृत्यकला अवगत असलेला
४२. नामघोष
४४. हिंमत
४७. चषक
४९. दाणे कुटण्याचे बिनविजेचे साधन
५०. पुरुषांच्या कानावरील अलंकार
५१. गच्च, दाटीवाटीने
५२. संरक्षक भिंत
५३. बातमीदार
५५. सामान्य प्रतीचा
५६. दक्ष राजाची कन्या
५७. ठरविलेला बेत
५९. परीक्षा घेणारा
६०. पाट्याचा जोडीदार
६१. दोरा
६२. नेहमी
६३. टोळीचा प्रमुख
६६. राख
६७. अभिवादन (हिंदी)
६९. पोत्याचे कापड
७०. कृष्णकथेतील वृक्ष
७२. वजन
७४. गाडीचे छत
७५. किंमत

**जम्बो शब्दकोडे क्र. १०५४ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.रतिमदन ५.पराभव ८.कोळसा ११.नरम ११अ.रम १२.नवरा १४.रक्षक १५.हाट १६.सर १७.टकमक १९.वखार २१.दासबोध २४.रग २५.गत २७.पर २८.कारा २९.करवत ३१.सन ३२.सुपारी ३४.गोरी ३५.रकाना ३७.खानसामा ३९.क्षमायाचक ४२.दालन ४३.खरी ४४.कळस ४५.नगर ४७.जनकजननी ५१.झोपडी ५२.रीम ५३.चवड ५४.बाई ५५.कलप ५७.लता ५९.सागर ६१.गीताई ६३.धारातीर्थी पडणे ६५.सलग ६६.खल ६७.नारी ६८.टक ६९.अजा ७१.सखी ७२.रकम ७४.रीतभात ७६.डाका ७८.खतरनाक ८०.मानव ८२.रवि ८४.टपकन ८५.रज ८६.पदरमोड

उभे उत्तर : १.रत्नहार २.मन ३.दर ४.नमस्कार ५.परसदार ६.रामरस ७.वन ८.कोरा करकरीत ९.सारक १०.चाकवत १३.वट १८.मगर २०.खानेसुमारी २२.बोका २३.धरा २५.गतकाल २६.मनन २७.परीक्षक ३०.वरदायिनी ३१.सखा ३३.प्रयास ३६.नानकटाई ३८.साखरझोप ४०.माळकरी ४१.कफन ४५.नरक ४६.वडीलधारी ४८.कचरणे ४९.जव ५०.नडगी ५४.बाईलवेडा ५६.लखलखीत ५८.तारा ५९.सापट ६०.गडकरी ६२.तास ६४.तीरकमान ६६.खसखस ६७.नायनाट ६९. अभाविप ७०.जात ७३.मन ७५.तर ७७.कापड ७९.कप ८१.वर ८३.घार

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



### पथनाट्याच्या माध्यमातून तरुणाईने टाकला 'डेअरी' उद्योगातील वास्तवावर प्रकाश

**पुणे : दैनिक संध्या**

आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्या पार्श्वभूमीवर पुणे ॲनिमल लिबरेशनच्या तरुण प्राणी-अधिकार कार्यकर्त्यांनी रविवारी फर्ग्युसन महाविद्यालयाच्या (एफ.सी. रोड) मुख्य प्रवेशद्वाराबाहेर पथनाट्य सादर केले. देशातील ११ शहरांमध्ये सुरू असलेल्या अभियानाचा हा एक भाग होता. सुमारे दहा मिनिटांच्या या पथनाट्यात भारतातील डेअरी उद्योगातील नैतिक प्रश्नांवर प्रकाश टाकत गायी, म्हशी आणि त्यांच्या वासरांच्या स्थितीबाबत नागरिकांनी विचार करण्याचे आवाहन करण्यात आले. 'कौन बनेगा करोडपती'शी संबंधित एका व्हायरल व्हिडिओमधील चर्चेपासून या अभियानाला प्रेरणा मिळाल्याचे आयोजकांनी सांगितले. या व्हिडिओमध्ये अमिताभ बच्चन आणि स्पर्धक सिद्धार्थ शर्मा यांच्यात डेअरी प्राण्यांच्या वास्तव परिस्थितीवर चर्चा झाल्याचा उल्लेख प्रेस रिलीजमध्ये करण्यात आला आहे. हा व्हिडिओ देशभरात मोठ्या प्रमाणावर पाहिला गेल्याचेही नमूद करण्यात आले आहे. डेअरी उद्योगाशी संबंधित प्रश्न केवळ प्राण्यांच्या हितापुरते मर्यादित नसून सार्वजनिक सुरक्षितता आणि पर्यावरणाशीही संबंधित असल्याचे आयोजकांनी सांगितले. दूध देण्याची क्षमता संपल्यानंतर गायींना सोडून देण्याच्या प्रकारावर सर्वोच्च न्यायालयाने केलेल्या निरीक्षणांचाही यावेळी उल्लेख करण्यात आला. रस्त्यावर सोडून दिलेल्या जनावरांमुळे अपघात होऊन नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत असल्याचे आयोजकांनी नमूद केले. "तरुणांपर्यंत हा विषय थेट आणि सहज पोहोचविण्यासाठी पथनाट्याचा मार्ग निवडला," असे कार्यक्रमाचे आयोजक प्रवीण गिरी यांनी सांगितले. तरुण अभियानकर्ते प्रांजल यांनीही या पथनाट्याच्या माध्यमातून डेअरी उद्योगाबाबतच्या चर्चेला सार्वजनिक अवकाशात आणण्याचा उद्देश असल्याचे स्पष्ट केले. दरम्यान, प्राणी, नागरिक आणि पर्यावरणाच्या हितासाठी अधिकाधिक वनस्पती-आधारित अन्नव्यवस्थेला प्रोत्साहन देण्याची मागणी या अभियानातून करण्यात आली आहे.



### बार्टी संशोधक विद्यार्थ्यांचा लढा तीव्र

**पुणे : दैनिक संध्या**

■ राहुल डंबाळे यांचे उद्यापासून उपोषण, समाजकल्याण आयुक्तालयाला 'टाळे ठोको' आंदोलन!

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (बार्टी) फेलोशिपधारक अनुसूचित जातीच्या संशोधक विद्यार्थ्यांचे गेल्या काही दिवसांपासून समाजकल्याण आयुक्त कार्यालयासमोर तीव्र आंदोलन सुरू आहे. १९ ऑगस्टपासून धरणे आंदोलन, तर २४ ऑगस्टपासून आमरण उपोषणास बसलेल्या या विद्यार्थ्यांच्या प्रकृतीची आणि मागण्यांची प्रशासनाने अजूनही दखल घेतलेली नाही. शासनाच्या जाचक अटींमुळे गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणापासून वंचित ठेवले जात असल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून जीवाची बाजी लावून उपोषणास बसलेल्या या विद्यार्थ्यांना जाहीर पाठिंबा देण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्या मान्य करून घेण्यासाठी रिपब्लिकन पक्षाचे नेते राहुल डंबाळे उद्यापासून स्वतः उपोषण आंदोलनाला बसणार आहेत. प्रशासनाच्या आणि सरकारच्या ढिम्म कारभाराचा तीव्र निषेध करण्यासाठी आणि हक्काची फेलोशिप मिळवण्यासाठी उद्या सर्व आंदोलक विद्यार्थी आणि कार्यकर्ते मिळून समाजकल्याण आयुक्तालयाला 'टाळे ठोको' आंदोलन करणार आहेत. याबाबत बोलताना राहुल डंबाळे म्हणाले, "सामाजिक न्याय विभागाकडे अतिरिक्त निधी उपलब्ध असतानाही, हजारो कोटी रुपये इतर विभागांना बेकायदेशीरपणे वळविले जात आहेत. गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना फेलोशिप नाकारणे हा अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळा आणण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न आहे. जोपर्यंत शासन २०२३ च्या जाचक आणि अन्यायकारक अटी रद्द करत नाही, तोपर्यंत आमचा हा लढा थांबणार नाही." संशोधक विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी आणि या स्वाभिमानाच्या लढ्यासाठी सर्व आंबेडकरी चळवळीतील संघटना, कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त पुण्यात क्रीडा जागृती प्रभातफेरी

**पुणे : दैनिक संध्या**



मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, राष्ट्रीय एकात्मता विद्यार्थी संघटना आणि फोरसाईट कॉलेज ऑफ कॉमर्स यांच्या संयुक्त विद्यमाने विविध क्रीडा जनजागृतीपर प्रभातफेरीचे आयोजन नुकतेच करण्यात आले."खेळा, निरोगी राहा आणि देशाच्या क्रीडा विकासात योगदान द्या" असा संदेश यावेळी देण्यात आला. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रातील विविध संधी, शारीरिक तंदुरुस्तीचे महत्त्व, नियमित व्यायाम, शिस्त आणि खेळाडूवृत्ती याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विविध क्रीडा प्रकारांचे सादरीकरण तसेच जनजागृतीपर उपक्रम घेण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून इंडियन तायक्वांदो अध्यक्ष नामदेव शिरगावकर, अर्जुन पुरस्कार विजेते व कबड्डीपटू शांताराम जाधव, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, फोरसाईट कॉलेज ऑफ कॉमर्सचे सचिव शैलेश मेहता, सहा. जिल्हा क्रीडा अधिकारी दादासाहेब देवकाते, राजाभाऊ कोळी तसेच ताहेर अस्सी उपस्थित होते. यावेळी माणिक चंदर देवकर, श्रीमती ऐश्वर्या आशुतोष साठे, चंद्रकांत ननावरे, अल्लाबक्ष शेख, दुर्योधन जठार, प्रल्हाद कारकर, जे. जे. के. जोशी,सुनील सातव, लक्ष्मण विठोबा सणस, मनोज धिवार, राहुल सर्जेराव नवले, संदीप कोळेकर, राजेंद्र गोविंद शेटे, प्रविण हिंगे आदींचा क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय योगदानाबद्दल पुष्पगुच्छ, शाल व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

# बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी समन्वयाने प्रभावी अंमलबजावणी करावी

## ॲनिमिया निर्मूलन, पोषण व्यवस्था बळकट करण्यासह राज्यात प्रारंभिक बालविकास सेवांचा विस्तार आवश्यक

**मुख्य सचिव राजेश अग्रवाल**

■ पुणे (दै. संध्या)



बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी आरोग्य, पोषण, संगोपन आणि प्रारंभिक शिक्षणाशी संबंधित योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विविध विभागांनी समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. बालकांमधील ॲनिमिया संदर्भात तातडीने, सातत्यपूर्ण आणि समन्वित उपाययोजना करण्याची गरज आहे. तसेच माता व बालकांसाठीच्या पोषण आहार व्यवस्थेतील त्रुटी दूर करून गुणवत्तापूर्ण पोषण आहाराची उपलब्धता सुनिश्चित करावी, असे प्रतिपादन राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी केले.

यशदा येथील लेझिम सभागृहात आयोजित 'बाल्यावस्थेतील प्रारंभिक विकास' कार्यशाळेच्या समारोपीय सत्रात ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, मेघालय राज्याचे प्रधान सचिव संपतकुमार, आदिवासी विभागाचे सचिव विजय वाघमारे, ग्रामविकास विभागाचे सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, यशदाचे महासंचालक डॉ. सुहास दिवसे यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि तज्ज्ञ डॉक्टर उपस्थित होते.

मुख्य सचिव श्री. अग्रवाल म्हणाले की, ॲनिमिया ही केवळ आरोग्य विभागापुरती मर्यादित बाब नाही. त्याचा बालकांच्या शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक विकासावर परिणाम होतो. त्यामुळे ॲनिमिया निर्मूलनासाठी नियमित तपासणी, पोषणविषयक जनजागृती, आवश्यक उपचार आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या कामात विविध विभागांचा समन्वय महत्त्वाचा आहे.

माता व बालकांना दिल्या जाणाऱ्या पोषण आहाराच्या व्यवस्थेतील कार्यपद्धतीचा आढावा घेऊन आवश्यक सुधारणा करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. आहार वितरणामध्ये केवळ योजना राबविण्यापेक्षा अन्नाची गुणवत्ता, पोषणमूल्य, सुरक्षितता आणि वेळेवर उपलब्धता यांना प्राधान्य दिले पाहिजे. तसेच मोठ्या प्रमाणावर गुणवत्तापूर्ण पोषण आहार उपलब्ध करून देण्यासाठी केंद्रीकृत स्वयंपाकगृहांसारख्या प्रभावी व विस्तारक्षम व्यवस्थांचा विचार करावा, असे त्यांनी सांगितले.

शाश्वत विकास उद्दिष्टे (एसडीजी) साध्य करण्यासाठी वंचित घटकांना आरोग्य, पोषण, स्वच्छता, सुरक्षितता आणि इतर मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याला प्राधान्य द्यावे, असे मुख्य सचिवांनी स्पष्ट केले. योजनांची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी धोरणात्मक नियोजनासोबतच त्यांची तळागाळातील अंमलबजावणी अधिक प्रभावी होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

वेगाने वाढणाऱ्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर अनौपचारिक व अल्प उत्पन्न असलेल्या शहरी वस्त्यांमध्ये प्रारंभिक बालविकासाच्या सुविधा आणि संगोपन सेवा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करून देण्याची गरज आहे. या भागातील बालक व मातांपर्यंत आरोग्य, पोषण, प्रारंभिक शिक्षण आणि संगोपनाच्या सेवा पोहोचविण्यासाठी प्रशासनाने विशेष लक्ष द्यावे, असे आवाहन श्री. अग्रवाल यांनी केले. स्थानिक स्वराज्य संस्था आणि विविध विभागांनी निधी, कार्ये आणि मनुष्यबळ अर्थात '3 एफ' (Funds, Functions आणि Functionaries) यांचा अधिकाधिक प्रभावी वापर करावा. उपलब्ध निधी, संबंधित कार्यांची जबाबदारी आणि क्षेत्रीय स्तरावर कार्यरत मनुष्यबळ यांचा योग्य समन्वय साधल्यास योजनांची अंमलबजावणी अधिक गतिमान व परिणामकारक होऊ शकते. विकेंद्रीकरणातून स्थानिक पातळीवरील कार्यक्षमता वाढविण्यावर भर देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

**कार्यशाळेत बालविकासाच्या विविध पैलूवर चर्चा**

आज दिवसभराच्या कार्यशाळेत सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक यांनी बालविकासाच्या विद्यमान व्यवस्थेची सद्यस्थिती, बलस्थाने व उणिवांवर मांडणी केली. मेघालय शासनाचे प्रधान सचिव संपतकुमार आणि बेटर पर्पज कलेक्टिव्हचे प्रतीक मित्तल यांनी बाल्यावस्थेतील प्रारंभिक विकासासाठी नेतृत्व आणि राज्याची क्षमता बळकट करण्याबाबत विचार मांडले. आयआयटी मुंबईच्या डॉ. रुपल यांनी पहिल्या १००० दिवसांतील खुंटलेली वाढ कमी करण्यासाठीच्या उपाययोजना, मातांचे मार्गदर्शन, वाढीचे निरीक्षण, प्रभावी स्तनपान व पूरक आहार याबाबत मांडणी केली.

### गणेशोत्सव 'डीजे'मुक्त आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करा

■ पुणे (दै. संध्या)


सार्वजनिक गणेशोत्सवाचे पावित्र्य राखण्यासाठी हा उत्सव पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि 'डीजे'मुक्त साजरा करावा, असे आवाहन हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र व छत्तीसगड राज्य संघटक सुनील घनवट यांनी केले आहे. याविषयी आपली भूमिका स्पष्ट करताना घनवट म्हणाले की, "गणेशोत्सव हा मूळचा सात्विक, पवित्र आणि आनंददायी असा उत्सव आहे. परंतु, गेल्या काही वर्षांपासून या मंगलमय उत्सवाला गालबोट लागल्याचे चित्र दिसत आहे. विशेषतः 'डीजे'च्या माध्यमातून लावली जाणारी अश्लील गाणी, त्यावर होणारी बीभत्स नृत्ये आणि कर्णकर्कश आवाज यांसारख्या विकृती उत्सवात शिरल्या आहेत. या सर्व प्रकारांमुळे गणेशभक्त आणि सामान्य नागरिकांच्या आरोग्याचा व शांततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. लोकमान्य टिळकांनी समाज प्रबोधन, लोकजागृती आणि हिंदु संघटन या उदात्त हेतूंनी सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केली होती. मात्र, सध्या पाश्चिमात्यांच्या अंधानुकरणामुळे हा मूळ उद्देश कुठेतरी हरवत चालला असून उत्सवाचे स्वरूप विकृत होत आहे. हिंदु जनजागृती समितीने गेल्या अनेक वर्षांपासून गणेशोत्सवातील या 'डीजे' संस्कृतीला आणि अन्य अनिष्ट प्रथांना सातत्याने कडाडून विरोध दर्शवला आहे. यावर्षीही अशा अपप्रवृत्तींना आळा बसावा, अशी आमची ठाम मागणी आहे.

### योगाला शिक्षण, रोजगार आणि राष्ट्र उभारणीशी जोडावे : राज्यपाल

■ पुणे (दै. संध्या)

भारताच्या युवा शक्तीला योग्य दिशा देण्यासाठी योगाला शाळा-महाविद्यालयांच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनविणे आवश्यक आहे. प्रत्येक शाळा आणि महाविद्यालयात पात्र योग शिक्षक अथवा प्रशिक्षकाचे स्वतंत्र पद निर्माण केले पाहिजे. यामुळे युवकांच्या आरोग्य व व्यक्तिमत्त्व विकासासोबतच प्रशिक्षित योग व्यावसायिकांसाठी रोजगार आणि उद्योजकतेच्या संधी निर्माण होतील, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.

लोणावळा येथील कैवल्यधाम योग संस्थेत स्वामी कुवलयानंद यांच्या १४३व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू, कैवल्यधामचे सचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी सुबोध तिवारी,



राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, प्रबंधक परिषदेच्या सदस्या पुष्पा मांडके उपस्थित होते. राज्यपाल म्हणाले, भारताकडे युवा शक्ती मोठ्या प्रमाणात असून त्याचा योग्य वापर केल्यास तो देशाचा सर्वात मोठा लोकसंख्याशास्त्रीय लाभांश ठरू शकतो. योगामुळे विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता, शारीरिक तंदुरुस्ती, भावनिक संतुलन आणि आत्मजागरूकता वाढण्यास मदत होईल. त्यामुळे योग हा केवळ अधूनमधून केला जाणारा उपक्रम न राहता शिक्षणव्यवस्थेचा नियमित भाग झाला पाहिजे, असे त्यांनी सांगितले. योगाच्या माध्यमातून जागतिक योग व वेलनेस अर्थव्यवस्था उभारण्याची भारताला मोठी संधी आहे. योग पर्यटन, प्रशिक्षण, संशोधन, डिजिटल व्यासपीठे, उपकरणे, वस्त्रे आणि विविध सेवांच्या माध्यमातून एमएसएमई, स्टार्टअप, महिला उद्योजक, कारागीर व स्थानिक समुदायांसाठी रोजगार आणि व्यवसायाच्या संधी निर्माण होऊ शकतात. योगाच्या माध्यमातून 'आत्मनिर्भर भारत' आणि 'विकसित भारत @२०४७'च्या उद्दिष्टांना चालना देता येईल, असे राज्यपालांनी नमूद केले.

### खाकी वर्दीचं स्वप्न पूर्ण केलं, इतरांसाठी ठरली प्रेरणा



■ पुणे (दै. संध्या)

पिढ्यानपिढ्या पारधी समाजाचा शिक्का. कमी वयात लग्न झालं. मात्र लग्नानंतरही समाजातील सर्व बंधने झुगारून, अंगावर खाकी चढवली. पण पतीकडून होणाऱ्या मानसिक छळाला कंटाळून अखेर तिने मृत्यूला कवटाळले.

बारामती तालुक्यातील करंजे येथील संगीता राजेंद्र काळे ऊर्फ संगीता किरण भोसले वय ३१, हिने पतीच्या वारंवार होणाऱ्या मानसिक त्रासाला कंटाळून गळफास घेत आत्महत्या केली. याबाबत मुंबई-डोंबवली येथील विष्णुनगर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून पतीला अटक करण्यात आली आहे. विष्णुनगर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, डोंबिवली पश्चिमेतील देवीचा पाडा परिसरात पतीकडून होणाऱ्या मानसिक व शारीरिक छळाला कंटाळून एका विवाहितेने आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी विष्णुनगर पोलिस ठाण्यात महिलेच्या पतीविरोधात भारतीय न्याय संहिता कलम १०८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संगीता राजेंद्र काळे ऊर्फ संगीता किरण भोसले (वय ३१) असे मृत विवाहितेचे नाव आहे. सुपे येथे तिचे सासर तर करंजे येथे माहेर आहे. सध्या त्या डोंबिवली पश्चिमेतील देवीचा पाडा परिसरात राहत होत्या. त्यांचे पती किरण भानुदास भोसले यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### शिल्पा गवारे मृत्यूप्रकारणी कठोर कारवाई करा : सुषमा अंधारे

■ पुणे (दै. संध्या)

वाकड येथील शिल्पा गवारे आत्महत्या प्रकरणी, उद्धव सेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी शनिवारी (दि. २९) पीडित कुटुंबीयांची, त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन सांत्वन केले. त्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. वैष्णवी प्रकरणानंतर तरी समाजातील सुशिक्षित कुटुंबांचे डोळे उघडतील, अशी अपेक्षा होती. मात्र, पुन्हा एका विवाहितेचा जीव जाणे ही अत्यंत वेदनादायी बाब आहे. लग्नाच्या नात्यावरच प्रश्नचिन्ह निर्माण करणाऱ्या अशा घटनांमधील दोषींना कोणतीही सूट मिळता कामा नये, असे अंधारे म्हणाल्या. गुन्हेगार कितीही प्रभावशाली असला किंवा त्याचे सत्ताधाऱ्यांशी संबंध असले, तरी राजकीय संबंध म्हणजे कुणाचा जीव घेण्याचा परवाना नाही. अशा आरोपींना पाठीशी घालणाऱ्यांच्या सामाजिक व नैतिक भूमिकेवरही प्रश्नचिन्ह निर्माण होते, अशी टीका त्यांनी केली. अशा संवेदनशील प्रकरणात बाजू मांडणाऱ्या वकिलांनी केवळ व्यावसायिकतेचा विचार न करता नैतिकता आणि सामाजिक बांधिलकीचे भान ठेवावे, असे आवाहनही त्यांनी केले. दरम्यान, सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवला जात असल्याचा आरोपही अंधारे यांनी केला.

# लकडी पूल विठ्ठल मंदिरास पेशवेकालीन वर्षासनाचा मान पुन्हा सुरू

## मंदिरास दिवाबत्तीसाठी देवदेवेश्वर संस्थान कडून मिळणारा वर्षासनाचा मान पुन्हा बहाल

■ पुणे (दै. संध्या)



पुण्याच्या साडेतीनशे वर्षांच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि सामाजिक वाटचालीचा साक्षीदार असलेल्या श्री लकडी पूल विठ्ठल मंदिरास पेशवेकाळापासून दिवाबत्तीसाठी देवदेवेश्वर संस्थानकडून मिळणारा वर्षासनाचा मान काही काळाच्या व्यत्ययानंतर पुन्हा सुरू करण्यात आला. मंदिराच्या इतिहासावरील संशोधनातून वर्षासनाचे पुरावे समोर आल्यानंतर देवदेवेश्वर संस्थान आणि श्री लकडी पूल विठ्ठल मंदिर ट्रस्टच्या नोंदींची खातरजमा करून हा ऐतिहासिक मान पुन्हा बहाल करण्यात आला.

श्री लकडी पूल विठ्ठल मंदिरात गोकुळाष्टमीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात करण्यात आली. देवदेवेश्वर संस्थानचे प्रमुख विश्वस्त रमेश भागवत यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून सप्ताहाचा प्रारंभ झाला. यावेळी श्री लकडी पूल विठ्ठल मंदिरास मिळणारा वर्षासनाचा मान पुन्हा सुरू करण्यात येत असल्याची अधिकृत घोषणा रमेश भागवत यांनी केली.

या समारंभास पुणे पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश शेळके, पुणे पत्रकार संघाचे उपाध्यक्ष किशोर बरकाले, ट्रस्टचे अध्यक्ष दिलीप बांदल, कोषाध्यक्ष दीपक थोरात, सचिव नरेंद्र गाजरे, पाचसोड्या विठोबा देवस्थानचे विश्वस्त रविंद्र फटाले, अखिल मंडई मंडळाचे विश्वास भोर, प्रसाद माने, नागनाथ पार सार्वजनिक गणपती मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष प्रितेश केदारी, सेवा मित्र मंडळाचे खजिनदार अमर लांडे, लायन्स क्लब पुणे सिटीचे उपाध्यक्ष दिलीप थोरात, खजिनदार बजरंग आकडे, जय मातादी सेवा संघाचे संस्थापक शिवाजी चव्हाण, ट्रस्टचे कर्मचारी तसेच महिला भजनी मंडळ उपस्थित होते.

श्री लकडी पूल विठ्ठल मंदिर ट्रस्टच्या वतीने कोषाध्यक्ष दीपक थोरात यांनी देवदेवेश्वर संस्थानचे प्रमुख विश्वस्त रमेश भागवत आणि पुणे पत्रकार संघाचे उपाध्यक्ष किशोर बरकाले यांचे आभार मानले. यावेळी विश्वस्त मंडळाच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

दीपक थोरात म्हणाले, पुण्याच्या स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील अनेक ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि सामाजिक घडामोडींचे श्री लकडी पूल विठ्ठल मंदिर साक्षीदार आहे. पुण्याच्या सुख-दुःखात तसेच विविध संकटांच्या काळात गेली साडेतीनशे वर्षे हे मंदिर पुण्याच्या मागे समर्थपणे उभे आहे. पानिपतच्या युद्धापासून रँडच्या वधापर्यंत, विदेशी कपड्यांच्या होळीपासून अनेक सामाजिक व ऐतिहासिक घटनांपर्यंत मंदिराने पुण्याचा इतिहास जवळून पाहिला आहे. ज्येष्ठ दिग्दर्शक व्ही. शांताराम यांच्या प्रभात सिनेमा तसेच अनेक गाजलेल्या मराठी चित्रपटांचे मंदिर परिसरात चित्रीकरण झाले आहे. भारतरत्न पं. भीमसेन जोशी यांनी मंदिरात अनेक वेळा रियाज केला असून, त्यांच्या रियाजातून अनेक प्रसिद्ध गाणी आकाराला आली. संत कलावती माता यांचे प्रथम प्रवचनही याच मंदिरात झाल्याची नोंद आहे. त्यामुळे मंदिर हे केवळ धार्मिक स्थळ नसून पुण्याच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि कलाक्षेत्राच्या वाटचालीचेही महत्त्वाचे केंद्र राहिले आहे. पेशवाईच्या काळात पुण्यातील अनेक मंदिरांना दिवाबत्तीसाठी देवदेवेश्वर संस्थानकडून वर्षासन दिले जात होते. त्याचप्रमाणे श्री लकडी पूल विठ्ठल मंदिरालाही वर्षासन मिळत असल्याचे पुरावे उपलब्ध झाले आहेत. कालांतराने अनावधानाने या वर्षासनाच्या मानामध्ये काही काळ व्यत्यय आला होता. दरम्यान, लेखक मंगेश चव्हाण यांनी श्री लकडी पूल विठ्ठल मंदिराच्या इतिहासावर लिहिलेल्या कथा एक मंदिराची या पुस्तकातून मंदिराच्या वर्षासनासंदर्भातील महत्त्वपूर्ण पुरावे समोर आले. पुस्तकातील नोंदी तसेच श्री लकडी पूल विठ्ठल मंदिर ट्रस्ट आणि देवदेवेश्वर पर्वती संस्थान यांच्या नोंदींची एकमेकांशी खातरजमा करण्यात आली. त्यानंतर वर्षासनाचा हा ऐतिहासिक मान पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## थोडक्यात पण महत्वाचे



## शाहीर संभाजी भगत यांना शाहीर विठ्ठल नांदूरकर स्मृती पुरस्कार प्रदान

**कवठे येमाई : दै. संध्या**

समाजामध्ये आपल्या शाहीरीने रसिकांची मने जिंकणारे शाहीर संभाजी भगत यांना शाहीर विठ्ठल नांदूरकर प्रतिष्ठानचा शाहीर विठ्ठल नांदूरकर स्मृती पुरस्कार शिवसेना उबाठा पक्षाचे विक्रोळीचे आमदार सुनिल राऊत यांच्या हस्ते शाल,श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन प्रदान करण्यात आला.प्रतिष्ठानच्या वतीने भव्य राज्यस्तरीय नृत्य स्पर्धा व पारितोषिक वितरण समारंभ सोहळा आमदार सुनील राऊत यांच्या हस्ते कन्नमवार नगर येथील विकास हायस्कूल सभागृहात मंगळवारी संपन्न झाला.या प्रसंगी पुणे येथील सर्जन डॉ.पी.टी.गायकवाड, राष्ट्रीय प्रवचनकार डॉ.दिलीप बागुल, नगरसेविका सुनीता चंद्रशेखर जाधव, शिवसेना उपविभाग प्रमुख चंद्रशेखर जाधव यांची मार्गदर्शन भाषणे झाली.हा कार्यक्रम नवोदित कलाकारांना संधी उपलब्ध देणारा असून माझ्या मतदारसंघात दरवर्षी आयोजित केला जातो.त्याबद्दल आयोजक विवेक गायकवाड यांचे आमदार सुनील राऊत यांनी कौतुक केले.शाहीर संभाजी भगत यांनी सत्काराला उत्तर देताना सांगितले की पालकांनी लहान मुलांच्या विकासाकडे लक्ष्य द्या.फिल्म इंडस्ट्री तुमची मुले गेली पाहिजे. यासाठी हे चांगले व्यासपीठ आहे.या प्रसंगी नृत्याच्या अविषकाराने सभागृह दणाणून गेले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन आयोजक विवेक गायकवाड यांनी केले होते. राज्याच्या पुणे जिल्हा संपर्कप्रमुखपदी प्रशांत भाऊ

## सांगडे यांची गुरव सोशल फाउंडेशनच्या पुणे जिल्हा संपर्कप्रमुखपदी निवड

**कवठे येमाई : दै. संध्या**

गुरव सोशल फाउंडेशन महाराष्ट्र राज्याच्या पुणे जिल्हा संपर्कप्रमुखपदी प्रशांत भाऊ सांगडे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.सामाजिक कार्याची आवड आणि समाजहितासाठी सातत्याने कार्य करण्याची भूमिका लक्षात घेऊन त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यांच्या माध्यमातून पुणे जिल्ह्यात गुरव सोशल फाउंडेशनचे सामाजिक कार्य अधिक प्रभावीपणे पुढे जाईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. प्रशांत भाऊ सांगडे यांना समस्त ग्रामस्थ कवठे येमाई यांनी पुढील सामाजिक वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत तसेच त्यांना उदंड आयुष्य, उत्तम आरोग्य, सुख-समृद्धी आणि यश लाभो, अशी ईश्वरचरणी प्रार्थना करण्यात आली असून त्यांचे नेतृत्व, मार्गदर्शन आणि समाजहिताची धडपड अशीच कायम राहो, या सदिच्छाही व्यक्त करण्यात आल्या आहेत.

## शिव महापुराण जीवांचे कल्याण करणारी कथा - हभप अमर महाराज एकडे

**पिंपरी: दै. संध्या**

शिव महापुराण ही जीवांचे कल्याण करणारी कथा आहे. श्रवण भक्ती सर्वश्रेष्ठ आहे. भक्ती नेहमी श्रद्धेने, निष्ठेने, भावाने करावी. भक्तीचे श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सक्य आणि आत्म निवेदन असे नऊ प्रकार आहेत हे समजून घेण्यासाठी शिवपुराण कथेचे श्रवण करावे असे हभप अमर महाराज एकडे (आळंदी) यांनी सांगितले. ज्येष्ठ माजी नगरसेवक नारायण बहिरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवतेज नगर चिंचवड येथील घरकुल चौकाजवळ श्री स्वामी समर्थ मंदिर येथे श्रावण मास निमित्त हभप अमर महाराज एकडे यांच्या शिवपुराण कथा वाचनाचे आयोजन करण्यात आले होते.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेले गाव मौजे वारजे ता.हवेली जि. पुणे येथील सर्व्हे नं.४५ हिस्सा नं. १अ/१अ/२अ/२० यांसी क्षेत्र ०० हेक्टर ९३ म्हणजेच ९३.०० चौ.मी म्हणजेच १००० चौ.फुट म्हणजेच ०१ आर लिहून देणार नामे श्री. संजय भगवान मुकटे यांचे क्षेत्र ०१ आर म्हणजेच ९२.९३ चौ.मी म्हणजेच १००० चौ.फुट जमीन मिळकत मालकी ताबे वहीवाटीची असून मुलकी रेकॉर्डला त्यांचे नावाची मालक म्हणून नोंद आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे, तसेच प्रमिला विलास नेहे यांच्याकडून नामे श्री. संजय भगवान मुकटे यांनी दि. १५/०७/२००० रोजी खरेदीखताने विकत घेतली असून सदरहु दस्त सह दुय्यम निंबधक वर्ग -२ हवेली क्र.४, दस्त क्र.५६३८/२००० अन्वये नोंदणी कार्यालयात नोंदणी झाला आहे, त्यामुळे प्रस्तुतच्या जमीन मिळकतीचे मालक म्हणून नामे श्री. संजय भगवान मुकटे आहेत, सदर जमीन मिळकत क्लियर व मार्केटेबल टायटल आहे असा भरवसा लिहून देणार श्री. संजय भगवान मुकटे यांनी आमचे अशिलांना दिला आहे. आमच्या अशिलाकडून विसाराची रक्कम स्वीकारून परिशिष्टातील जमीन मिळकत विकत देण्याचे मान्य व कबुल केले आहे . तरी सदर जमीन मिळकतीवर किंवा तिचे भागावर इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबध हरकत, क्लेम, अग्रहक्क, विसारपावती, मुखत्यार, तोंडी किंवा लेखी करार-मदार, कर्ज प्रकरण, कोर्ट प्रकरण, बँक जप्ती, रस्त्याचे हक्क, अतिक्रमण, गहाण, दान, लीन, लीज, अन्न वस्त्र, चोळीबांगडी इ. प्रकारे अगर इतर कोणत्याही प्रकारे अगर इतर कोणत्याही प्रकारे हरकत, क्लेम अथवा हक्क असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसाचे आत पुराव्याचे अस्सल कागदपत्रानिशी पोहोच घेऊन लेखी हरकत घेऊन आमचे अशिलातर्फे आमची खात्री पटवावी अन्यथा मुदतीत कोणाचीही हरकत, तक्रार न आल्यास संबधितानी त्यांचे हक्क, अधिकार, हरकत सोडून दिले आहेत असे समजुन आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. सबब ही जाहीर नोटीस..

परिशिष्ट

तुकडी पुणे पोट तुकडी ता. हवेली मे सब रजिस्टार हवेली, यांचे हद्दीतील तसेच ता.हवेली यांचे कार्यकक्षेतील गाव मौजे वारजे ता. हवेली जि.पुणे यांसी सर्व्हे नं.४५ हिस्सा नं. १अ/१अ/२अ/२० यांसी क्षेत्र ०० हे ०१ आर जमीन मिळकत यांसी चतु:सीमा :

पुर्वेस : याच सर्व्हे नं. मधील अंतर्गत १५ फुट रस्ता
दक्षिणेस : श्री राठोड व थावरे यांची मिळकत
पश्चिमेस : श्री थावरु धर्मा राठोड यांची मिळकत
उत्तरेस : श्री रामू सोमा चव्हाण यांची मिळकत

ठिकाण : पुणे
दि.२९/०८/२०२६

श्री. संजय भगवान मुकटे
(अशिलाची सही)

श्री. उमाकांत मधुकर आदमाने
एम.कॉम, एल एल बी एल एल एम. डी. आय.बी. जी.डी.सी. अ‍ॅन्ड ए
अ‍ॅडव्होकेट अ‍ॅन्ड नोटरी (भारत सरकार)
पत्ता :- सर्व्हे नं. ४४/१. दुधाणे हाईटम, ऑफिस नं. १, पहिला मजला,
गणपती माथा वमस्टॉप ममोर, वारजे, एन डी ए रोड, पुणे - ४११०५८,
मो.नं. ९८२२५३६१४३/९५६२३४९००००९




शनिवारी मुंबई येथे देशाचे केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांचे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी स्वागत केले.या प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा आदी उपस्थित होते. रक्षाबंधनाच्या पवित्र पर्वानिमित्त यावेळी अमित शहा यांना सुनेत्रा अजित पवार यांनी राखी बांधून रक्षाबंधनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

## पुणे जिल्हास्तरीय विषय शिक्षक कार्यशाळा उत्साहात संपन्न

**जेजुरी(दै. संध्या)**

पुणे जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग आणि पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, कला-क्रीडा, गणित व विज्ञान विषयांच्या जिल्हास्तरीय शिक्षक कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांचे अध्यापन अधिक प्रभावी, गुणवत्तापूर्ण आणि विद्यार्थी-केंद्रित करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यशाळांना शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यशाळेचे उद्घाटन पुणे जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर यांच्या हस्ते झाले. यावेळी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव ,राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर, पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रसाद गायकवाड, सचिव शिवाजीराव कामथे, कार्याध्यक्ष राजेश गायकवाड, विश्वस्थ हनुमंत कुबडे, अरुण थोरात, शिवाजी किलकिले सर्व कार्यकारणी सदस्य पदाधिकारी तालुका अध्यक्ष सचिव व हजोरोच्या संख्येने विषय शिक्षक उपस्थित होते उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. भाऊसाहेब कारेकर यांनी, "प्रत्येक विद्यार्थी गुणवत्तापूर्ण शिक्षण घेऊन आदर्श, संस्कारक्षम आणि जबाबदार नागरिक घडला पाहिजे. शाळांची गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षकांना आवश्यक मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने विषयवार कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेत मिळालेले ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवून त्यांच्या गुणवत्तावाढीसाठी शिक्षकांनी प्रयत्नशील राहावे," असे आवाहन केले.

# अणणाभाऊ साठे जयंती सोहळ्यातून शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे गरजेचे

पाळीव प्राण्यांना कुटुंबातील सदस्य म्हणून कव्हरेज देणारी भारतातील पहिली हेल्थ इन्शुरन्स पॉलिसी

**नारायणगाव (दै. संध्या)**

दिघी गाव पुणे येथे डॉ.साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे प्रतिष्ठान,सकल मातंग समाजाच्यावतीने लोकशाहीर साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे जयंतीचे भव्य आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या निमित्ताने माजी नगरसेवक अविनाशजी बागवे म्हणाले, '"लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती सोहळ्यातून मातंग समाजाला शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले पाहिजे'!

"शिक्षणाने समाजामध्ये नावलौकिक मिळवणाऱ्या मान्यवरांचा अशा कार्यक्रमात सत्कार केल्यास त्यांचा आदर्श इतरांना होईल.त्यातून सामाजिक स्तर आणि सामाजिक प्रगती झाल्याशिवाय राहणार नाही.'! साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती सोहळा साजरा करणे म्हणजे फक्त मनोरंजनाचा भाग न राहता'. तो संस्कृती, संस्कार, मातंग समाजातील महामानवाच्या इतिहासा बरोबरच शिक्षण हा तिसरा डोळा आहे. हे पटवून दिले पाहिजे.तरच वर्तमानात समाजाची प्रगती होईल.



यावेळी दयानंद अडागळे, आळंदी नगर पालिका नगरसेवक श्री सुरेश नाना झोंबाडे, पिंपरी चिंचवड शहर जेष्ठ नेते भाऊसाहेब आढागळे, नगरसेवक उदय भाऊ गायकवाड, नगरसेवक कृष्णाजी सुरूकुले, नगरसेवक श्रुतीताई डोळस, सामाजिक कार्यकर्ते संजय भाऊ गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र तापकीर, सामाजिक कार्यकर्ते राजू वाळके, पिंपरी चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष चंद्रकांत दादा लोंढे, प्रा. मोहनराव कांबळे, प्रा. काशिनाथ आल्हाट, रमेश सकट, टायगर सेनेचे संस्थापक अध्यक्ष बापूराव वाघमारे, माजी नगरसेवक विकास डोळस, ज्ञानेश आल्हाट, विधानसभा अध्यक्ष उद्योजक मनोज कदम, प्रमोद परदेशी, प्रमोद पठारे, अमित महाडिक, मंगेश अस्वले, शिवा पिल्ले आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रतिष्ठान व सकल मातंग समाज-अखिल दिघीगाव कार्यकारिणी अध्यक्ष अविनाश लोणारे, उपाध्यक्ष शिवाजी ढावरे, कार्याध्यक्ष सचिन दुबळे, सचिव राजेंद्र मोरे, खजिनदार संतोष मोहिते, संघटक लक्ष्मण गव्हाणे, संपर्कप्रमुख संजय एडके, प्रवक्ता फुलचंद घोडे, गजेंद्र गायकवाड, मनोज लांडगे, रामदास राक्षे, सुनील मोरे,दीपक केदारे,संतोष मांडवडे, अरुण भिसे, नवनाथ कांबळे, भारत गव्हाणे यांनी भरपूर परिश्रम घेतले. या कार्यक्रमाच्या वेळी नगरसेवक उदय भाऊ गायकवाड यांनी समाज मंदिर बांधून देण्याचे आश्वासन दिले. तसेच प्रतिष्ठानचे अध्यक्ष अविनाश लोणारे यांनी मुलींना उच्च शिक्षण देऊन एक मुलगी कॅनडामध्ये शिक्षण घेत आहे. तर दुसरी हवाई सुंदरी म्हणून कार्यरत आहे. त्यामुळे त्यांचा नगरसेवक अविनाश बागवे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## विशेष मुलांच्या सेवाकार्याला 'सार्थक' सन्मानाची थाप!

**शिरूर (दै. संध्या)**

विशेष मुलांच्या शिक्षण, संगोपन, प्रशिक्षण आणि सर्वांगीण विकासासाठी गेल्या अनेक वर्षांपासून निस्वार्थपणे कार्यरत असलेल्या आकांक्षा एज्युकेशनल फाउंडेशनच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याचा 'सार्थक सेवा सन्मान पुरस्कार' देऊन गौरव करण्यात आला. सार्थक संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात हा सन्मान उत्साहपूर्ण व भावनिक वातावरणात प्रदान करण्यात आला.





आकांक्षा एज्युकेशनल फाउंडेशनच्या विशेष मुलांसाठी सुरू असलेल्या सेवाभावी कार्याची दखल घेत सार्थक संस्थेच्या संस्थापिका व अध्यक्षा स्वाती नामजोशी, कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या सौ. पूनम किर्लोस्कर आणि निरंजन किर्लोस्कर यांच्या हस्ते आकांक्षा फाउंडेशनला 'सार्थक सेवा सन्मान पुरस्कार' प्रदान करण्यात आला. यावेळी आकांक्षा फाउंडेशनच्या सामाजिक कार्याला बळ देण्यासाठी आर्थिक स्वरूपाची मदतही करण्यात आली. विशेष मुलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणे, त्यांना शिक्षण व प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे, त्यांच्या क्षमतांना योग्य दिशा देणे आणि त्यांना आत्मनिर्भरतेच्या दिशेने घेऊन जाणे, हे आकांक्षा एज्युकेशनल फाउंडेशनचे प्रमुख ध्येय आहे. त्यामुळे मिळालेला हा पुरस्कार केवळ संस्थेचा सन्मान नसून विशेष मुलांसाठी कार्य करणाऱ्या प्रत्येक शिक्षक, कर्मचारी, पालक आणि त्यांच्या संघर्षाचा गौरव असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.'आकांक्षा' ही केवळ एक संस्था नसून विशेष मुलांच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण करण्याचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. या कार्याची समाजाने घेतलेली दखल आणि मिळालेला सन्मान संस्थेच्या पुढील वाटचालीसाठी नवी ऊर्जा व प्रेरणा देणारा ठरला आहे. सन्मानासाठी नव्हे.

## चौथा राज्यस्तरीय श्रावणधारा काव्यमहोत्सव मोठ्या उत्साहात

**नारायणगाव (दै. संध्या)**

अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय, ओतूर येथे रविवार, २४ ऑगस्ट रोजी चौथा राज्यस्तरीय 'श्रावणधारा' काव्यमहोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. राज्याच्या विविध भागांतून आलेल्या कवी-कवयित्रींनी आपल्या दर्जेदार काव्यरचनांचे सादरीकरण करून उपस्थितांची दाद मिळवली.

कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. संस्थेचे खजिनदार रणजित पवार यांनी प्रास्ताविक केले तर स्वागताध्यक्ष डॉ. खं. र. माळवे यांनी सर्वांचे स्वागत केले. यावेळी सर्व प्रमुख पाहुण्यांचा संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला. तसेच कवी इंजि. शिवाजीराव चाळक आणि उत्तम सदाकाळ या ज्येष्ठ साहित्यिकांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच आनंदा वळे, डॉ. ऋत्विक कोंडार आणि डॉ. पुष्पांजली वळे यांचाही गौरव करण्यात आला. या महोत्सवात ५ पुस्तकांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले- १.राजेश साबळे ओतूरकर लिखित लेखसंग्रह 'मला काही सांगायचंय' २.डॉ. प्रवीण डुंबरे यांचा बालकवितासंग्रह 'आई, दे ना खाऊ!' ३.डॉ. खं. र. माळवे यांचा 'सामाजिक पर्यावरण' लेखसंग्रह ४.शोभा गवांदे-कानवडे यांचा 'भागीरथाची गंगा' ५.श्रावणधारा काव्यमहोत्सव समितीचा प्रातिनिधिक काव्यसंग्रह भाग-३ याप्रसंगी जिल्हा परिषद सदस्या डॉ. छायाताई तांबे या उद्घाटक तर शोभाताई गवांदे-कानवडे या अध्यक्षस्थानी होत्या. माजी जि.प. सदस्य मोहितशेठ ढमाले, प्राचार्य डॉ. रमेश शिरसाट, पंचायत समिती सदस्य प्रशांत डुंबरे, मराठी विभाग प्रमुख डॉ. वसंत गावड हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

# आळेफाटा पशुधन बाजारात ८८ लाखांची उलाढाल, शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद

**नारायणगाव (दै. संध्या)**

जुन्नर तालुक्यातील आळेफाटा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या बाजार आवारात गुरुवारी झालेल्या साप्ताहिक बाजारामध्ये गायींची विक्रमी आवक झाली. या एकाच दिवसाच्या बाजारात तब्बल ८८ लाख २४ हजार रुपयांची मोठी आर्थिक उलाढाल झाली असल्याची माहिती बाजार समितीचे सचिव रुपेश कवडे व सतीश मस्करे यांनी दिली आहे.

हा साप्ताहिक बाजार दर गुरुवारी सकाळी ७ ते दुपारी १ वाजेपर्यंत भरवला जातो, जेथे शेतकरी थेट व्यापाऱ्यांशी व्यवहार करू शकतात. या साप्ताहिक बाजारामध्ये पुणे, अहमदनगर तसेच परिसरातील विविध भागांतून शेतकरी, पशुपालक आणि व्यापारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

बाजारात एकूण ५५२ गायी विक्रीसाठी दाखल झाल्या होत्या. यापैकी ४६४ गायींची प्रत्यक्ष खरेदी-विक्री झाली. बाजारात आलेल्या गायींना चांगला भाव मिळाल्यामुळे शेतकरी आणि पशुपालकांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.

या बाजारात गायींना ५ हजार रुपयांपासून ते ७० हजार रुपयांपर्यंत प्रतिगाय असा दर मिळाला.

चांगल्या प्रतीच्या आणि दुभत्या गायींना व्यापाऱ्यांकडून मोठी मागणी होती.दरम्यान, दुग्ध व्यवसायात सध्या विविध अडचणी आणि समस्या असल्या तरीही, या भागात पशुपालनाकडे शेतकऱ्यांचा कल वाढताना दिसत आहे.

आळेफाटा येथील पशुधन बाजारामुळे जुन्नर आणि आसपासच्या परिसरातील पशुपालकांना जनावरांच्या खरेदी-विक्रीसाठी एक हक्काची आणि मोठी बाजारपेठ उपलब्ध झाली आहे. या साप्ताहिक बाजारामुळे ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळत आहे.



## थोडक्यात पण महत्वाचे



## कर्णकर्कश आवाज करणाऱ्या मॉडिफाइड सायलेन्सरवर पोलिसांचा हातोडा

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या कारवाईचा धडाका पाहता दुचाकींच्या सायलेन्सरमध्ये बदल करून कर्णकर्कश करत जाणाऱ्या गाड्यांचा आवाज कमी होईल, अशी अपेक्षा होती. मात्र, फेब्रुवारीतील कारवाईनंतर अवघ्या पाच महिन्यानंतर पुन्हा कारवाई करत तब्बल ५६८ सायलेन्सर जप्त करून त्यावरूण रोड रोलर फिरविण्यात आला. मागील कारवाईच्या तुलनेत यावेळी १६९ सायलेन्सर अधिक आढळल्याने कारवाईचा धाक निर्माण होण्याऐवजी नियमबाह्य सायलेन्सरचा वापर वाढत असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. दोन मोठ्या कारवायांत आतापर्यंत ९६७ सायलेन्सरचा चुराडा करण्यात आला. तरीही कर्णकर्कश 'आवाज' थांबण्याचे नाव घेत नसल्याने पोलिसांच्या कारवाईचा धाक निर्माण होत नसल्याचे चित्र आहे. पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या वाहतूक शाखेने सर्व वाहतूक विभागांना सोबत घेत नियमबाह्य नंबर प्लेट आणि मॉडिफाइड सायलेन्सरविरोधात संयुक्त मोहीम राबविली. या कारवाईत २,५६६ नियमबाह्य नंबर प्लेट आणि ५६८ मॉडिफाइड सायलेन्सरवर कारवाई करण्यात आली. जप्त केलेले सायलेन्सरचा रोड रोलर फिरवून चुराडा करण्यात आला. मॉडिफाइड सायलेन्सर बसविणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई केल्यानंतरही ते पुन्हा बाजारात उपलब्ध होत असतील, तर या उपकरणांचा पुरवठा कुठून होतो, कोण विक्री करतो आणि बाहेरून कोण मागवतो, याचा शोध घेण्याची आवश्यकता आहे. वाहतूक पोलिसांनीही आता याच दिशेने पाऊल टाकले असून बाहेरून मॉडिफाइड सायलेन्सर मागवून विक्री करणाऱ्या डीलर्सची पाहणी करून त्यांच्यावरही कारवाई केली जाणार आहे. यामुळे आगामी काळातील कारवाई केवळ 'वाहन पकडले आणि दंड केला' इतकी मर्यादित न राहता विक्रेता आणि पुरवठादारांपर्यंत पोहोचणार का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. सायलेन्सरसोबतच नियमबाह्य नंबर प्लेटविरोधातही पोलिसांनी मोठी मोहीम राबवली. १३ वाहतूक विभागांच्या आकडेवारीनुसार तब्बल २,५६६ नंबर प्लेटवर कारवाई करण्यात आली. नंबर प्लेट हा वाहनाची ओळख दर्शविणारा अत्यंत महत्त्वाचा भाग असताना फॅन्सी, अस्पष्ट किंवा नियमबाह्य प्लेट वापरण्याचा प्रकार अद्याप मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचे या आकडेवारीवरून स्पष्ट होते. त्यामुळे नागरिकांनी सरकारी नियमांनुसार एचएसआरपी (High Security Registration Plate) नंबर प्लेटच आपल्या वाहनाला बसवावी, असे आवाहन वाहतूक पोलिसांकडून करण्यात आले आहे. नियमबाह्य सायलेन्सर, नंबर प्लेट, विनाहेल्मेट वाहन चालविणे अथवा इतर वाहतूक नियमांचे वारंवार उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर केवळ दंडाची कारवाई करून उपयोग होणार नाही. 'दंड भरला आणि पुन्हा तोच प्रकार' अशी मानसिकता मोडण्यासाठी वारंवार नियमभंग करणाऱ्यांचे ड्रायव्हिंग लायसन्स निलंबित करण्याच्या दिशेनेही वाहतूक पोलिसांकडून पावले उचलली जात आहेत. विशेषतः विनाहेल्मेट आणि वारंवार नियम मोडणाऱ्या वाहनचालकांवर लक्ष ठेवून पुनरावृत्ती करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा पोलिसांचा मानस आहे.

## मुख्य जलवाहिनीवर 'डल्ला'; एजंटच्या माध्यमातून रातोरात अनधिकृत नळजोड?

**देहूगाव : दैनिक संध्या**

देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या मुख्य जलवाहिनीवर डल्ला मारत अनधिकृत नळजोड देण्याचा प्रकार देहूरोडमध्ये पुन्हा उघडकीस आल्याने खळबळ उडाली आहे. अधिकृत नळजोड घेण्यासाठी नागरिकांना कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत असताना, एजेंटच्या माध्यमातून रातोरात अनधिकृत नळजोड मिळत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे 'अधिकृत नळजोड घेण्यासाठी गाढव मेल ओझ्याने,अन् शिंगुरु गेलं हेलपट्याने आणि अनधिकृत नळासाठी एजंटचे जाळे' आशा शब्दांत देहूरोडचे नागरिक संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करू लागले आहेत. देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या कारभारावरच प्रश्नचिन्ह उपस्थित करू लागले आहेत. स्थानिकांच्या माहितीनुसार, काही एजंट गरजू नागरिकांकडून मोठी रक्कम उकाळून बोर्डाच्या मुख्य जलवाहिनीवरून बेकायदेशीर जोडणी करून थेट घरापर्यंत पाइपलाइन टाकत आहेत. एक-एक इंचाच्या पाइपद्वारे पाण्याची चोरी सुरू असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे, या जोडण्यांसाठी कोणतीही अधिकृत पाणीपट्टी आकारणी होत नसल्याने शासनाचा महसूलही मोठ्या प्रमाणात बुडत आहे. देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्ड हद्दीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, राजीव गांधीनगर, शिवाजीनगर आदी भागांत अशा प्रकारच्या अनधिकृत जोडण्या सुरू असल्याचे नागरिकांकडून सांगण्यात येत आहे. अधिकृत नळजोड घेण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया करताना, परवाने आणि विविध कागदपत्रांची पूर्तता करत असताना, नागरिकांची दमछाक होते. आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पूर्तता करूनही अनेकदा बोर्ड कार्यालयात वारंवार चकरा मारून देखील अधिकृत नळजोड मिळण्यास विलंब केला जात आहे. मात्र, एजंटच्या माध्यमातून पैसे मोजले की रातोरात नळजोडणी मिळते, असे उघडपणे देहूरोडमधील नागरिक बोलू लागले आहेत. त्यामुळे कॅन्टोन्मेंट बोर्ड प्रशासनाने संबंधित परिसरातील सर्व नळजोडण्यांची विशेष तपासणी करून अनधिकृतपणे दिलेल नळजोड तातडीने शोधून, दोषींवर कठोर कारवाई करावी. पाणीचोरीला संरक्षण देणाऱ्यांवरही कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## पिंपरीत बाप्पाच्या आगमनाची लगबग

**पिंपरी : दैनिक संध्या**

काही दिवसांवर गणेशोत्सव येऊन ठेपला असून, शहरात ठिकठिकाणी मूर्तीचे स्टॉल्स उभारण्यात आले आहेत. नागरिकांकडून बाप्पाच्या मुर्तीचे आगाऊ बुकिंग सुरु झाल्याने बुकिंगसाठी भाविकांची गर्दी होताना दिसून येत आहे. यावर्षी जास्वंदीच्या फुलामध्ये बसलेली, फेटा बांधलेली, घोड्यावर बसलेली, साधूच्या वेशातील वीणा वाजविणारी, पार्वतीच्या मांडीवर बसलेली, मोटारीत बसलेली, संत तुकाराम महाराजांच्या वेशभूषेतील, गिटार वाजविणारी, मूषकावर, मोदकावर, पाटावर, पाळण्यात, नंदी बैलावर, स्वामी समर्थांच्या रूपात, विठ्ठलाच्या रूपात, बालाजीच्या रूपात, पेशवाई, शंकर पार्वतींसमवेत, बालगणेश रूपातील अशी नानाविध रूपातील मूर्ती विक्रीस ठेवण्यात आल्या आहेत. यावर्षी शहरात लवकर स्टॉल्स लागल्यामुळे मूर्तीची निवड करण्यासाठी नागरिकांना मोठा अवधी मिळणार आहे. महिना आधीच भक्तांना गणेशोत्सवाचे वेध लागलेले असतात. सध्या कुंभारवाड्यात व कारखान्यात तयार झालेल्या गणेशमूर्ती बाजारात विक्रीसाठी दाखल होऊ लागल्या आहेत. काही ठराविक स्टॉल्सवर पेणच्या मूर्ती विक्रीसाठी ठेवल्या जातात. या मूर्ती सुबक आणि आकर्षक असतात. म्हणून ग्राहकांची देखील पसंती मिळत आहे. दरवर्षीपेक्षा यंदा शहरात नाविन्यपूर्ण अशा ड्रेपरी घातलेल्या नाविन्यपूर्ण गणेशमूर्ती दाखल झाल्या आहेत. दरवर्षी गणेशमूर्ती तयार करतानाच मातीचे उपरणे, धोतर, शेला, फेटा अशा स्वरूपात तयार करून त्यांना रंगरंगोटी केली जाते. यंदा कापडी पोशाखातील या मूर्ती ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत.

# पिंपरी-चिंचवडमध्ये जल, वायू अन् ध्वनी प्रदूषणाचा कहर

### शहरातील नद्यांमध्ये सांडपाणी, हवेत धुळीचे कण अन् १०० डेसिबलपर्यंत कर्णकर्कश आवाज; प्रदूषण रोखण्यासाठी ठोस धोरणाकडे महापालिकेचे दुर्लक्ष

■ **पिंपरी(दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड शहरातील पवना, इंद्रायणी आणि मुळा या तीन नद्या अतिप्रदूषित होऊन गटारगंगा झाल्या असून, त्या धोकादायक पातळीवर पोहचल्या आहेत. तसेच, बांधकाम प्रकल्प, आरएमसी प्लांट, उद्योग, रस्ते खोदकाम, भंगार गोदाम, वाहनांची बेसुमार संख्या आणि इतर कारणांमुळे शहरात वायू आणि ध्वनी प्रदूषणाने नागरिक बेजार झाले आहेत. त्याबाबत दिर्घकालीन कठोर उपाययोजना करण्याकडे महापालिका प्रशासन उदासीन असल्याचे पर्यावरण अभियांत्रिकी विभागाच्या सद्य:स्थिती अहवालावरून समोर आले आहे.

शहरातून पवना, इंद्रायणी आणि मुळा या नद्या वाहतात. शहरात एकूण 91.50 किलोमीटर अंतराचे लहान व मोठे असे 143 नाले आहेत. एमआयडीसी परिसरातील कंपन्या तसेच, लघुउद्योगांचे रासायनिक सांडपाणी तसेच, घरगुती मैलासांडपाणी थेट नाल्याद्वारे नदीत मिसळत आहे. संपूर्ण शहरात महापालिकेकडून मैलासांडपाणी शुद्धीकरण केंद्र (एसटीपी) अद्यापही उभारण्यात आलेले नाहीत. काही एसटीपी बंद स्थिती असल्याने थेट नदीत ते सांडपाणी नदीत मिसळत आहे. त्यामुळे नदीचे पाणी अतिदूषित झाले असून, दुर्गंधी येत आहे. नदी पात्रात बांधकाम राडारोडा टाकून भराव करण्याचे प्रकार दिवसाढवळ्या सुरू असून, ते थांबण्यास महापालिकेस अपयश आले आहे.

विविध कारणांमुळे नदीतील पाण्याची गुणवत्ता ढासळली असल्याचा दावा पर्यावरण तज्ज्ञांकडून केला जात आहे. मात्र, पर्यावरण अहवालात नदीतील पाण्यातील ऑक्सिजनची पातळी 7.1 ते 7.9 अशी मर्यादित असल्याचा दावा करण्यात आला आहे. महापालिकेने केलेल्या सर्वेक्षणात शहरातील नैसर्गिक नाल्यांवर तब्बल 365 ठिकाणी अतिक्रमण तसेच, ते बुजवल्याचे प्रकार समोर आला आहे. नाले अतिक्रमणमुक्त करण्याबाबत वारंवार घोषणा केल्या जात आहेत. प्रत्यक्ष कृती होताना दिसत नाही.

शहरात अनेक भागांत गृहप्रकल्पासाठी इमारतींचे बांधकाम सुरू आहेत. चाळीस मजली इमारत निर्माण होत आहेत. त्यासाठी रेडीमिक्स प्लांट सुरू असल्याने तसेच, तेथील रस्ते खोदकामांमुळे शहरात धुळीचे प्रदूषण वाढत आहे. कर्कश आवाजामुळे ध्वनी प्रदूषणात भर पडत आहे. तसेच, सकाळी सात ते रात्री दहा वेळेत बांधकामांना बंदी असतानाही कामे केली जात आहेत. त्यासंदर्भात तक्रारी करूनही महापालिकेकडून ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. आवश्यक ती खबरदारी घेतली जात नसल्याने बांधकाम प्रकल्पातील अवजड वाहनांमुळे रस्त्यांवर चिखल, माती, दगड, खडी पडून रस्ते खराब होत आहेत. भंगार साहित्य जाळण्याचे प्रकार कमी होत नाहीत. वाढत्या वाहनांच्या संख्येमुळे वायू व ध्वनी प्रदूषणात मोठी भर वाढत आहे. उन्हाळा आणि हिवाळ्यात शहराचे हवा गुणवत्ता निर्देशांक (एक्यूआय) 190 पर्यंत पोहचतो. त्यामुळे फुफ्फस, हृदयविकार, मुले व वृद्धांना श्वास घेण्यास त्रास होतो, असे अहवालात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.




### ठोस धोरण बनवण्याकडे पालिकेचे दुर्लक्ष

महापालिका प्रदूषण रोखण्याबाबत गंभीर नसल्याने ठोस धोरण तयार केले जात नाही. छोट्या-मोठ्या घटकांसाठी अर्थसंकल्पात तरतूद केली जाते. स्मार्ट ट्रॉफीक प्रणालीची आवश्यकता असताना, आवश्यक नसलेल्या अर्बन स्ट्रीटची कामे केली जात आहेत. सीसीटीव्ही यंत्रणा बंद आहे. मोठी कामे केल्यानंतर त्यांच्या देखभाल व दुरूस्तीकडे दुर्लक्ष केले जाते. त्यानंतर निधी नसल्याचे कारण दिले जाते. महापालिका, पीएमआरडीए, एमआयडीसी, राष्ट्रीय हरित लवाद, पर्यावरण आदी विभागांची एक समिती बनवून प्रत्यक्ष कृती करणे आवश्यक आहे. शहरापासून दिल्लीपर्यंत भाजपची सत्ता असून, त्यांनी कठोर भूमिका घेऊन नियम बनवण्यास शहरातील प्रदूषणाला बऱ्यापैकी आळा बसेल, असे पिंपरी-चिंचवड सिटीजन फोरमचे तुषार शिंदे यांनी सांगितले. शहरात बेसुमारपणे सुरू असलेले बांधकाम प्रकल्प, रस्ते खोदकाम, नवीन प्रकल्प, मेट्रो आदी कामामुळे शहरात ध्वनी प्रदूषण धोकादायक पातळीवर पोहचले आहे. वाहनांच्या संख्येत पिंपरी-चिंचवड आणि पुणे शहर संपूर्ण देशात दुसऱ्या क्रमांकावर जाऊन पोहचले आहे. वाहनांमुळे ध्वनिप्रदूषणात वाढतच चालले आहे. तसेच, शहरात गणेशोत्स व दिवाळी सणात सर्वाधिक ध्वनी प्रदूषण होत असल्याचे अहवालात स्पष्ट केले आहे. तब्बल १०० डेसिबलपर्यंत आवाजाची नोंद झाली आहे. त्यामुळे बालकांसह, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक व रुग्णांवर त्याचे दुष्परिणाम होत आहेत. ड्राय मिस्ट बेस्ड सिस्टीम म्हणजेच पाण्याचे तुषार उडणारे यंत्रणा (कारंजे) शहरातील २३ ठिकाणच्या चौकात बसवण्यात आली आहे. त्याद्वारे धूलिकण जड होऊन जमिनीवर बसतात, असा दावा महापालिकेने केला होता. त्यातील अनेक यंत्रणा सध्या बंद स्थितीत आहेत. तसेच, स्टेशनरी फॉग कॅनन ही पाच वाहने शहरात नेमण्यात आली होती. त्याद्वारे रस्त्यावरील हवेतील धूळ नियंत्रित होईल, असा दावा करण्यात आला होता. मात्र, ती वाहने नियमितपणे रस्त्यावर फिरत नसल्याचे चित्र आहे.

## पोलीस फ्रेन्डस् वेलफेअर असोसिएशनतर्फे पोलीस बांधवांना राखी बांधून रक्षाबंधन साजरे



■ **वाकड (दै. संध्या)**

पोलीस फ्रेन्डस् वेलफेअर असोसिएशनच्या वतीने चिंचवड पोलीस स्टेशन आणि पिंपरी पोलीस स्टेशन येथे रक्षाबंधनाचा सण उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी असोसिएशनच्या महिला पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना राखी बांधून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

सर्वसामान्य नागरिकांचे सण-उत्सव आनंदी आणि सुरक्षित वातावरणात पार पडावेत यासाठी पोलीस अधिकारी व कर्मचारी दिवस-रात्र कर्तव्य बजावत असतात. त्यामुळे त्यांनाही सणाचा आनंद अनुभवता यावा या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आल्याची माहिती पोलीस फ्रेन्डस् वेलफेअर असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष गजाननभाऊ चिंचवडे यांनी दिली.

या कार्यक्रमास चिंचवड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्तात्रय चासकर, पिंपरी पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक रूपाली बोबडे, असोसिएशनचे सचिव शुभम चिंचवडे, पुणे जिल्हाध्यक्ष सचिन लाड, पुणे जिल्हा युवक अध्यक्ष कमलजित सिंग, रणजित वडणे, उदय वाडेकर, निर्मला माने, अर्चना पाटील, जान्हवी हजारे, तृप्ती चैतन्य, शीतल दुर्वे, शैला काळे, अंजली स्वामी यांच्यासह दोन्ही पोलीस ठाण्यांतील अधिकारी, कर्मचारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राखी बांधण्याच्या या उपक्रमामुळे पोलीस आणि नागरिकांमधील स्नेहबंध अधिक दृढ होत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला.

## शिवतेज नगर येथे शिवपुराण कथेचा समारोप

■ **पिंपरी(दै. संध्या)**

शिव महापुराण ही जीवांचे कल्याण करणारी कथा आहे. श्रवण भक्ती सर्वश्रेष्ठ आहे. भक्ती नेहमी श्रद्धेने, निष्ठेने, भावाने करावी. भक्तीचे श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सक्य आणि आत्म निवेदन असे नऊ प्रकार आहेत हे समजून घेण्यासाठी शिवपुराण कथेचे श्रवण करावे असे हभप अमर महाराज एकडे (आळंदी) यांनी सांगितले. ज्येष्ठ माजी नगरसेवक नारायण बहिरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवतेज नगर चिंचवड येथील घरकुल चौकाजवळ श्री स्वामी समर्थ मंदिर येथे श्रावण मास निमित्त हभप अमर महाराज एकडे यांच्या शिवपुराण कथा वाचनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यांना ज्येष्ठ नागरिक श्रीमंत पवार काका (टाळ), महेश गव्हाणे (तबला) आणि वैभव महाराज (हार्मोनियम) यांनी साथ दिली. या कार्यक्रमाच्या आयोजनात सारिका रिकामे, स्नेहा गुणवंत, क्षमा काळे, गीता पाटील, विद्या दुदुसकर, नीलिमा भंगाळे, स्मिता शिरसाट, मंगल काळे, छाया महाजन, अश्विनी केवाडकर आणि हरिनारायण शेळके काका, राजीव गुणवंत, दीपक बिरादार, चैतन्य बनकर, मेघराज बागी, रोहन नंदनवाड यांनी आयोजनात सहभाग घेतला होता. "मंगलम भगवान विष्णू, मंगलम गरुड ध्वज, मंगलम पुंडरी काक्षो, मंगलाय तनु हर" या मंत्राने हभप अमर महाराज एकडे शिवपुराण कथा वाचनाचा समारोप केला. यावेळी बालगोपाळांनी शिव पुराण कथेतील "शिवपार्वती विवाह" आणि इतर प्रसंग सादर केले.



शिवतेज नगर चिंचवड येथील श्री स्वामी समर्थ मंदिर येथे वर्षभर विविध पारंपरिक व धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. त्याचा हजारो भक्त, भाविक लाभ घेतात अशी माहिती नारायण बहिरवाडे यांनी दिली.

## आमदार जगताप यांच्या हस्ते कै. राहुल साबळे यांच्या कुटुंबाला ५ लाखांची मदत

■ **पिंपरी (दै. संध्या)**

स्वातंत्र्यदिनानिमित्त केलेली विद्युत रोषणाई उतरवताना कासारवाडी 'ह' क्षेत्रीय कार्यालयाच्या छतावरून पडून दुर्दैवी मृत्यू झालेल्या कामगार राहुल साबळे यांच्या कुटुंबीयांना ५ लाख रुपयांची आर्थिक मदत सुपूर्द करण्यात आली आहे. शनिवारी (२९ ऑगस्ट) आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते या मदतीचा धनादेश मृत कामगाराच्या पत्नी आणि वडिलांकडे सोपवण्यात आला.

काळेवाडीतील विजयनगर येथील रहिवासी असलेले राहुल साबळे (वय ४३) हे एका कंत्राटदार कंपनीत कार्यरत होते. १५ ऑगस्टनिमित्त कासारवाडी येथील 'ह' प्रभाग क्षेत्रीय कार्यालयाच्या दोन मजली पत्र्याच्या छतावर चढून विद्युत रोषणाई उतरवण्याचे काम सुरू असताना, त्यांचा



पाय घसरून ते थेट खाली कोसळले. या दुर्घटनेत गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. या अचानक घडलेल्या दुर्दैवी घटनेमुळे साबळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला होता. पोटाची खळगी भरण्यासाठी काम करताना प्राण गमावलेल्या कष्टाळू कामगाराच्या कुटुंबाला सावरण्यासाठी आणि दिलासा देण्यासाठी आमदार जगताप पुढे आले. त्यांनी संपूर्ण प्रकारची माहिती घेतली. या साबळे कुटुंबाला सावरण्यासाठी तात्काळ आर्थिक मदत देऊन आधार दिला. २९ ऑगस्ट रोजी पिंपळे गुरव येथील जनसंपर्क कार्यालयात आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते हा धनादेश कुटुंबाला देण्यात आला.

यावेळी कै. राहुल यांच्या पत्नी संगीता राहुल साबळे, तसेच वडील विठ्ठल महादू साबळे यावेळी उपस्थित होते. त्यांच्याकडे धनादेश सुपुर्त करण्यात आला आहे. या वेळी ह प्रभाग अध्यक्षा तृप्ती कांबळे तसेच परिसरातील स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. जगताप यांनी यावेळी साबळे कुटुंबीयांचे सांत्वन करत या कठीण काळात त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची ग्वाही दिली.

## थोडक्यात पण महत्वाचे



### जेजुरी पोलिसांना विद्यार्थिनींकडून राखी बांधून अनोखा रक्षाबंधन सोहळा

**जेजुरी : दैनिक संध्या**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचलित जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे येथील विद्यार्थिनींनी जेजुरी पोलिस स्टेशनमधील पोलिस बांधवांना राख्या बांधून रक्षाबंधनाचा अनोखा आणि भावनिक सोहळा साजरा केला. या उपक्रमातून पोलीस आणि विद्यार्थी यांच्यातील आपुलकीचे नाते अधिक दृढ झाले असून, भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्याचा सुंदर संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यात आला. पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव,राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर, पर्यवेक्षक बाळासाहेब जगताप,माध्यमिक विभागप्रमुख प्रल्हाद गिरमे, ज्युनिअर विभागप्रमुख किरण मोडक यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी जेजुरी पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रविंद्र पाटील यांनी विद्यार्थिनींचे उत्स्फूर्त स्वागत करून त्यांना खाऊचे वाटप केले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, “पोलीस हे केवळ कायदा व सुव्यवस्था राखणारे अधिकारी नसून समाजाच्या सुरक्षिततेसाठी सदैव तत्पर असणारे तुमचे रक्षक आहेत. विद्यार्थ्यांनी कायद्याचा आदर करावा, वाहतुकीचे नियम पाळावेत, सायबर गुन्ह्यांबाबत जागरूक राहावे आणि कोणतीही अडचण आल्यास न घाबरता पोलिसांशी संपर्क साधावा. रक्षाबंधनाचा हा सण केवळ राखी बांधण्यापुरता मर्यादित नसून एकमेकांच्या संरक्षणाची, विश्वासाची आणि जबाबदारीची भावना जपण्याचा संदेश देतो,” असे त्यांनी सांगितले.यावेळी योगेश घोरपडे,राजेंद्र ताम्हाणे यांनी रक्षाबंधनाचे महत्व सांगितले. या प्रसंगी पोलीस उपनिरीक्षक शिवाजी काटे, पोलीस हवालदार विठ्ठल कदम, पोलीस कॉन्स्टेबल प्रसाद कोळेकर, निकम साहेब, मारुती करडे तसेच महिला पोलीस कॉन्स्टेबल पूजा गिरडे उपस्थित होते. विद्यार्थिनींनी सर्व पोलिस बांधवांना राख्या बांधून त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे नियोजन जेजुरी पोलिस स्टेशनचे पोलीस हवालदार आण्णासाहेब देशमुख,भूषण कदम, विद्यालयातील शिक्षक अजय जगताप, योगेश घोरपडे व राजेंद्र ताम्हाणे यांनी केले. तसेच या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जेजुरी पोलिस स्टेशनच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे विशेष सहकार्य लाभले.

### राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात विद्यार्थ्यांकडून विविध क्रीडा प्रकारांची प्रात्यक्षिके

**आळंदी : दैनिक संध्या**

श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्था संचलित श्री ज्ञानेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेजमध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. हॉकीचे महान क्रीडापटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकारांची प्रात्यक्षिके सादर केली. मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन संस्थेचे सचिव अजित वडगावकर, खजिनदार डॉ. दीपक पाटील, विश्वस्त लक्ष्मण घुंडरे, विद्यालयाच्या पर्यवेक्षिका अनिता पडळकर व प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक प्रदीप काळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अजित वडगावकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, “खेळ हा केवळ मनोरंजनाचे साधन नसून व्यक्तिमत्त्व विकास, शिस्त, आत्मविश्वास आणि उत्तम आरोग्याचा पाया आहे,” असे सांगितले. मेजर ध्यानचंद यांचा संघर्ष, जिद्द आणि क्रीडाक्षेत्रातील योगदान विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले. क्रीडा विभागप्रमुख श्रीरंग पवार यांनी मेजर ध्यानचंद यांच्या जीवनकार्याची माहिती दिली. तसेच नियमित व्यायाम व क्रीडा सहभागामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होणाऱ्या सकारात्मक परिणामांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी खो-खो, डॉजबॉल, १०० मीटर धावणे, गोळाफेक आदी क्रीडा प्रकारांची प्रात्यक्षिके सादर केली. यावेळी क्रीडा शिक्षक राजश्री भुजबळ, वाय. एस. कांबळे व पी. एस. पवार उपस्थित होते. वाय. एस. कांबळे यांनी आभार मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

### संकटसमयी धावून आले ओतूर पोलीस; तत्परतेचे कौतुक

**नारायणगाव : दैनिक संध्या**

डायल ११२ वर आलेल्या मदतीच्या कॉलला तातडीने प्रतिसाद देत ओतूर पोलिसांनी साबळेवाडी येथे एका महिलेचे प्राण वाचवले. पोलिसांच्या प्रसंगावधानासोबतच वेळ न दवडता केलेल्या मदतीमुळे संबंधित महिलेला वेळीच वैद्यकीय उपचार मिळू शकले. साबळेवाडी ता. जुन्नर येथील रेश्मा लक्ष्मण साबळे यांनी घरगुती कारणातून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची माहिती पोलिसांना मिळाली. घटनेची माहिती डायल ११२ द्वारे मिळताच ओतूरचे सहायक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार जनार्दन सापटे आणि महिला पोलीस शिपाई संगीता दिघे यांनी विलंब न करता घटनास्थळी पोहोचत परिस्थिती हाताळली. त्यांनी तातडीने रुग्णवाहिकेला संपर्क साधला. रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्यानंतर संबंधित महिलेला उपचारासाठी ओतूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या महिलेची प्रकृती व्यवस्थित असल्याची माहिती मिळाली आहे. संकटसमयी योग्य निर्णय घेत तातडीने मदत केल्याने एका महिलेचे प्राण वाचविण्यात ओतूर पोलिसांना यश आले. पोलिसांच्या या तत्पर कारवाईमुळे संभाव्य अनर्थ टळला. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या मदतीसाठी पोलिसांनी वेळ न दवडता धावून जाणे आणि आवश्यक वैद्यकीय मदत उपलब्ध करून देणे, याचे या घटनेतून पुन्हा एकदा दर्शन घडले. 'संकटसमयी नागरिकांच्या मदतीला धावून जाणे, हाच खरा पोलीस धर्म,' या उक्तीचा प्रत्यय या घटनेतून स्पष्ट होत आहे. सापटे आणि दिघे यांच्या प्रसंगावधान, तत्परता आणि कर्तव्यनिष्ठेचे नागरिकांकडून कौतुक होत असून, ओतूर पोलिसांच्या या कार्याचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

### गौरी-गणपती सजावट स्पर्धेचे आयोजन

**कोरेगावमुळ: दैनिक संध्या**

लोणीकंद (ता.हवेली) येथील गावातील महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी, आपल्या देशाच्या व महाराष्ट्राच्या संस्कृती व परंपरेचे जतन करण्यासाठी गौरी-गणपती सजावट स्पर्धेचे भव्य आयोजन लोणीकंद ग्रामपंचायतीचे सदस्य गौरव राजाराम झुरुंगे यांच्या वतीने करण्यात आले आहे. ही स्पर्धा फक्त लोणीकंद गावातील एकूण ६ वार्डात होणार आहे. यामध्ये एकूण ६ वार्डातून प्रत्येक वार्डातून प्रथम, द्वितिय, तृतीय प्रावीण्य मिळवणाऱ्या म्हणजेच ६ वार्डात,प्रत्येकी वार्डात ३ विजेत्या क्रमांकानूसार एकूण १८ विजेत्या स्पर्धकांना विशेष आकर्षक पारितोषित देऊन त्यांना गौरविण्यात येणार आहे. तर सहभागी महिलेस विशेष आकर्षण म्हणून साडी भेट देण्यात येणार आहे. या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकविणाऱ्या विजेत्यास एल.सी.डी. टिव्ही (असे ६ वार्ड साठी ६ टिव्ही), द्वितीय क्रमांकास वॉशिंग मशीन(६ वार्ड साठी ६ वॉशिंग मशीन), तृतीय क्रमांकास फ्रिज(६ वार्ड साठी ६ फ्रिज) तसेच प्रत्येक सहभागी महिलेस विशेष आकर्षण म्हणून साडी भेट देण्यात येणार आहे. या स्पर्धेत लोणीकंद गावातील जास्तीत जास्त स्पर्धकांनी नोंदणी करून सहभाग घेण्याचे आवाहन गौरव राजाराम झुरुंगे परिवाराकडून करण्यात आले आहे.



# अंधविश्वासाऐवजी हवी प्रत्येक गोष्टीत प्रश्न विचारण्याची वृत्ती

## सासवडच्या श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या विज्ञान प्रदर्शनात परीक्षकांचा मोलाचा संदेश

**■ सासवड(दै. संध्या)**

विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाला हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ अंतर्गत शिवाजी इंग्लिश स्कूलच्या (सीबीएसई) प्रांगणात आयोजित‘विज्ञान प्रदर्शन २०२६’ अत्यंत उत्साहात पार पडले. या प्रदर्शनादरम्यान परीक्षकांनी व्यक्त केलेले मनोगत आणि विद्यार्थ्यांचे प्रयोगांमधील वैज्ञानिक कुतूहल विशेष आकर्षण ठरले.

संस्थेचे मार्गदर्शक सनदी अधिकारी डॉ . राजेंद्र जगताप, सचिव व माजी आमदार संजय जगताप यांच्या संकल्पनेतून आयोजीत या प्रदर्शनाचे उद्घाटन संस्थेच्या अध्यक्षा आनंदीकाकी जगताप, विश्वस्त व ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी जगताप, संस्थापक सचिव डॉ. एम. एस. जाधव, विश्वस्त सोनाली शिंदे, यशवंत बोत्रे, बाळासाहेब रासकर व बाळासाहेब झिंजुरके यांच्या प्रमुख उपस्थितीत हे प्रदर्शन झाले.

'विज्ञान आणि विचारातून विकास' संकल्पनेवर आधारित या प्रदर्शनात प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांनी सौर ऊर्जा, कचरा व्यवस्थापन, स्मार्ट सिटी, पर्यावरण संवर्धन, शाश्वत ऊर्जा आणि आधुनिक शेती तंत्रज्ञान यांसारख्या विषयांवर शंभरहून अधिक नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर केले. उत्कृष्ट प्रयोगांचे परीक्षण करून विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यामध्ये शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल सासवड या विद्यालयाने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. कार्यक्रमाचे स्वागत प्राचार्य अनिल पाटील यांनी, तर विद्या समितीचे सचिव रविंद्रपंत जगताप यांनी प्रास्ताविक केले.

#### दूरदृष्टीमुळे उत्तम संस्थात्मक कार्य

- या प्रदर्शनाचे परीक्षण संतोष पिसे, प्रा. गजेंद्र अहिवळे, प्रल्हाद पवार, विजय काकडे, प्रा. अमित पावशे, अनिल गद्रे व प्रा. ऋतुजा राऊत यांनी केले.
- प्रदर्शनाच्या यशस्वितेनंतर आपले मनोगत व्यक्त करताना परीक्षक प्रा. अमित पावशे आणि प्रा. गजेंद्र अहिवळे यांनी विद्यार्थ्यांना एक मोलाचा संदेश दिला. संस्थापक स्व. चंदुकाका जगताप यांच्या दूरदृष्टीमुळे उत्तम संस्थात्मक कार्य उभे राहिल्याचे सांगत त्यांनी नमूद केले की, "विद्यार्थ्यांमध्ये अंधविश्वासाऐवजी प्रत्येक गोष्टीत प्रश्न विचारण्याची वृत्ती हवी."
- या वैज्ञानिक प्रदर्शनाच्या परीक्षणातून आम्हालाही खूप काही नवीन शिकायला मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.
- सहसचिव दत्तात्रेय गवळी, व्यवस्थापक कानिफनाथ आमराळे, प्राचार्य डॉ. अभिजीत टकले, एस. पी. जाधव आणि विज्ञान समितीच्या पदाधिकाऱ्यांनी संयोजनाची धुरा सांभाळली.
- उत्कृष्ट प्रयोगांचे परीक्षण करून विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.
- श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ अंतर्गत शिवाजी इंग्लिश स्कूलच्या (सीबीएसई) प्रांगणात आयोजित ‘विज्ञान प्रदर्शन २०२६’ अत्यंत उत्साहात पार पडले.

#### विजेते विद्यार्थी:

प्राथमिक गट: सृजन शिंदे व सहर्ष शिंदे, अर्जुन भोसले (इंग्लिश स्कूल सासवड); श्रीमुनी मेमाणे व श्रेया मेमाणे (जेजुरी).

माध्यमिक गट (पाचवी ते सातवी): साई कुंभारकर व आर्यन जगदाळे (गुरुकुल सासवड); राजवीर जगताप (इंग्लिश स्कूल सासवड); साई यादव व सार्थक यादव (हरणी).

माध्यमिक गट (आठवी ते दहावी): वेदांत शेंडकर व ओंकार शेंडकर (मावडी पिंपरी); ईश्वरी हिंगणे व आर्या गदादे (जिजामाता जेजुरी); शरण्या पवार व विद्या गोसावी (गुरुकुल सासवड).

ज्युनिअर कॉलेज: रोहित भूजबळ (जिजामाता जेजुरी); स्वयम भिसे (इंग्लिश स्कूल सासवड).

शिक्षक गट: शिल्पा कुलकर्णी (इंग्लिश स्कूल सासवड); कृष्णप्रिया गोलांडे (मालखेड); दिप्ती खोमणे (खळद).

## वारूळवाडी ग्रामसभेत कचऱ्यावर कठोर निर्णय

**■ नारायणगाव(दै. संध्या)**

वारूळवाडी येथील ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या विशेष ग्रामसभेत एक अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्या सोसायट्या आणि नागरिकांवर आता तब्बल १० हजार रुपयांचा दंड आकारण्याचा ठराव या ग्रामसभेत एकमताने मंजूर करण्यात आला आहे.

ही ग्रामसभा गुरुवारी दि. २७ रोजी वारूळवाडी ग्रामपंचायत कार्यालयात पार पडली. प्रशासक विनायक भुजबळ यांच्या अध्यक्षतेखाली या ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला गावातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती.

ग्रामसभेमध्ये गावातील घनकचरा व्यवस्थापनाचा मुद्दा अतिशय गंभीरपणे चर्चिला गेला. अनेक सोसायट्यांमधील ओला व सुका कचरा वेगळा केला जात नसल्याची आणि हा कचरा सार्वजनिक ठिकाणी टाकला जात असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली. यावर माजी सरपंच देवेंद्र बनकर व संतोष वारुळे यांनी कचरा टाकणाऱ्यांवर कडक दंडात्मक कारवाई करण्याची मागणी केली. त्यानुसार, सार्वजनिक स्वच्छता राखण्यासाठी १० हजार रुपयांचा मोठा दंड आकारण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच, घणकचरा व्यवस्थापनासाठी मोठ्या आर्थिक तरतुदीची गरज असल्याचे सांगत, प्रशासक विनायक भुजबळ यांनी कचरा टाकणाऱ्यांवर कायदेशीर आणि दंडात्मक कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा दिला.

याप्रसंगी तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षपदी अभिषेक भुजबळ यांची, तर उपाध्यक्षपदी पंकज भालेकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.प्रशासक विनायक भुजबळ यांनी या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या नावांची अधिकृत घोषणा केली. ग्रामसभेत सचिव म्हणून विनोद साबळे यांनी कामकाज पाहिले. त्यांनी विषयपत्रिकेवरील ग्रामविकास योजना, घनकचरा व्यवस्थापन, प्रधानमंत्री आवास योजना,सोळावा वित्त आयोग नियोजन, विविध योजनांच्या लाभार्थ्यांची निवड, ग्रामपंचायतीचा जमा-खर्च तसेच बालविवाह रोखण्यासाठीच्या उपाययोजना या विषयांचे वाचन केले, ज्याला ग्रामसभेने मंजुरी दिली. याशिवाय सभेत गावकऱ्यांनी अनेक प्रलंबित मागण्या मांडल्या- अतिक्रमण आणि रस्ते दुरुस्ती: गायरान जमिनीवर अतिक्रमण झाल्याची तक्रार माजी सरपंच राजेंद्र मेहेर यांनी केली.तसेच कॉलेज रोड व अभंगवस्ती रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी अविनाश घोलप व राकेश गायकवाड यांनी केली.

शालेय सुविधा: प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शुद्ध पाणीपुरवठा करावा, नादुरुस्त पाण्याचे फिल्टर आणि खुली व्यायामशाळा दुरुस्त करावी, तसेच विद्यार्थ्यांच्या स्वच्छतागृहांची स्वच्छता राखावी, अशी मागणी जयश्री खिल्लारी यांनी केली. जालिंदर कोल्हे, बबनराव कानडे ज्योती संते व रमेश मुजबळ यांनीही गावाच्या विकासासाठी विविध मागण्या केल्या.

दरम्यान, माजी आमदार अतुल बेनके यांच्या निधीतून कॉलेज रस्त्यासाठी ३० लाख रुपयांचा निधी मंजूर झाल्याची माहिती सभेत देण्यात आली. तसेच ज्योतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकासाठी लवकरच योग्य जागा निश्चित करण्यात येईल, अशी ग्वाही प्रशासक विनायक भुजबळ यांनी दिली. या महत्त्वपूर्ण ग्रामसभेला गावातील अनेक आजी-माजी पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

## रेशन धान्याच्या निकृष्ट दर्जाबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

**■ नांदेड (दै. संध्या)**

नांदेड जिल्ह्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत (रेशन) नागरिकांना मिळणाऱ्या तांदूळ, गहू व इतर धान्याच्या निकृष्ट दर्जाबाबत गंभीर तक्रारी समोर येत असून, या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी पत्रकार संरक्षण समितीचे नांदेड जिल्हा संघटक लक्ष्मीकांत गोविंदराव कलमुर्गे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, नांदेड जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये रेशन दुकानां मधून वितरित होणाऱ्या धान्याच्या गुणवत्तेबाबत नागरिकांमध्ये नाराजी आहे. काही ठिकाणी खराब, निकृष्ट दर्जाचे तसेच मानवी वापरासाठी अयोग्य वाटणारे धान्य नागरिकांना वितरित केले जात असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. गरीब, मजूर, शेतकरी आणि गरजू कुटुंबांसाठी रेशन व्यवस्था ही जीवनावश्यक आधार व्यवस्था आहे. त्यामुळे या व्यवस्थेतील कोणतीही हलगर्जीपणा नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम करू शकतो, असे कलमुर्गे यांनी नमूद केले. धान्याचा दर्जा तपासण्यासाठी जिल्ह्यातील सर्व रेशन दुकानांमधील साठ्याची गुणवत्ता तपासणी करण्यात यावी, निकृष्ट धान्य पुरवठा करणाऱ्या संबंधित अधिकारी, ठेकेदार व दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच धान्याची साठवणूक, वाहतूक आणि वितरण प्रक्रियेची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. यासोबतच प्रत्येक तालुक्यात अचानक तपासणी पथके नियुक्त करून रेशन व्यवस्थेवर प्रभावी नियंत्रण ठेवावे आणि नागरिकांना दर्जेदार व सुरक्षित धान्य मिळेल याची प्रशासनाने हमी द्यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. “रेशन व्यवस्था ही गरीब जनतेच्या जीवनाशी निगडित अत्यंत महत्त्वाची योजना आहे. त्यामुळे या विषयाकडे केवळ प्रशासकीय बाब म्हणून न पाहता नागरिकांच्या अन्न सुरक्षा व आरोग्याचा प्रश्न म्हणून गांभीर्याने पाहण्याची गरज आहे,” असे लक्ष्मीकांत कलमुर्गे यांनी सांगितले. या निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने दखल घेऊन चौकशी करावी व दोषींवर कठोर कारवाई करून जनतेला न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

## बकोरी देवराई वनराई प्रकल्पात झाडांना राखी बांधून रक्षाबंधन सण साजरा

**■ कोरेगावमुळ (दै. संध्या)**

बकोरी देवराई वनराई प्रकल्पात यंदाही पर्यावरणपूरक पद्धतीने झाडांना राखी बांधून रक्षाबंधन सण उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रकल्पात दरवर्षी हिंदू संस्कृतीतील सर्व सण निसर्गाशी नाते जोडत साजरे करण्याची परंपरा आहे. यावर्षी गावात दुःखद घटना घडल्यामुळे चंद्रकांत वारघडे यांच्या कुटुंबातील सर्व सदस्य उपस्थित राहू शकले नाहीत. मात्र रक्षाबंधनाची परंपरा खंडित होऊ नये म्हणून वारघडे यांची कन्या पूजा कुटे हिने झाडांना राखी बांधून हा सण साजरा केला. चंद्रकांत वारघडे यांचे झाडांशी असलेले नाते परिसरात वेगळी ओळख निर्माण करणारे ठरले आहे. ते प्रत्येक झाडात परमेश्वराचे दर्शन मानतात आणि गेल्या दहा वर्षांपासून दररोज झाडे, पशू व पक्ष्यांची निस्वार्थ सेवा करत आहेत. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांतून आजपर्यंत एक लाखांहून अधिक झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले असून भविष्यात एक कोटी झाडे लावण्याचा संकल्प त्यांनी केला आहे. नुकताच महाराष्ट्र शासनाचा छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार (पुणे विभाग प्रथम क्रमांक) जाहीर झाल्याने



राज्यभरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. वृक्षलागवडीबरोबरच वारघडे यांनी जलसंधारणालाही प्राधान्य दिले आहे. भविष्यात बकोरी गावातील कोणत्याही शेतकऱ्याला किंवा नागरिकाला सलग दोन वर्षे पाऊस नाही पडला तरी पाण्याची टंचाई भासू नये, हे त्यांचे स्वप्न आहे. त्यासाठी त्यांनी डोंगरावर ३,००० हून अधिक समांतर चर खोदले असून एक कोटी लिटर क्षमतेचा ‘छत्रपती जलाशय’ उभारला आहे. या उपक्रमांमुळे आतापर्यंत पाच कोटी लिटर पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्यात यश आले आहे. भविष्यात १०० कोटी लिटर वाहून जाणारे पाणी जमिनीत मुरविण्याचे ध्येय साध्य करण्यासाठी तसेच १ कोटी झाडांचे वृक्षारोपण करण्यासाठ सर्व नागरिकांनी सहकार्य करावे.

## उरुळी कांचनमध्ये गावठी पिस्टलसह शस्त्रसाठा जप्त

### रेकॉर्डवरील गुन्हेगाराला एटीएसकडून अटक

**■ उरुळी कांचन (दै. संध्या)**

उरुळी कांचन (ता. हवेली) परिसरात बेकायदा शस्त्र बाळगणाऱ्या रेकॉर्डवरील गुन्हेगाराला पुणे ग्रामीण दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) ताब्यात घेतले. त्याच्याकडून एक गावठी बनावटीचे पिस्टल, दोन जिवंत काडतुसे आणि दोन कोयते, असा एकूण ५१ हजार २०० रुपयांचा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई (ता. २७ ऑगस्ट) रोजी उरुळी कांचन-डाळिंब रोडवरील सदानंद बेकरी परिसरात करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुणे ग्रामीण दहशतवाद विरोधी पथक उरुळी कांचन पोलीस ठाण्याच्या हद्दीत गोपनीय माहिती घेत असताना सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक निलेश कदम आणि महेश गायकवाड यांना बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, सदानंद बेकरीजवळ एक इसम गावठी पिस्टल घेऊन थांबला आहे.


मिळालेल्या माहितीच्या आधारे एटीएस पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यावेळी संशयितरित्या आढळून आलेल्या भाऊसो ऊर्फ भावड्या भगवान महाडिक (वय ३४, सध्या रा. डाळिंब रोड, खुडे वस्ती, ता. दौंड; मूळ रा. शिंदवणे, ता. हवेली) याला पळून जाण्याच्या तयारीत असताना पोलीसांनी ताब्यात घेण्यात आले. आरोपीची झडती घेतली असता त्याच्याकडे एक गावठी बनावटीचे पिस्टल, दोन जिवंत काडतुसे आणि दोन कोयते आढळून आले. या सर्व शस्त्रांची एकूण किंमत ५१ हजार २०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपीविरुद्ध भारतीय हत्यार कायदा कलमानुसार तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम नुसार उरुळी कांचन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भाऊसो महाडिक हा पोलिसांच्या रेकॉर्डवरील गुन्हेगार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. यापूर्वी आयटीआय, बोरी भडक परिसरात पाच साथीदारांसह जमाव जमवून मारहाण करून गंभीर दुखापत केल्याप्रकरणी त्याच्याविरुद्ध यवत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. या प्रकरणाची सुनावणी दौंड न्यायालयात सुरू आहे.

या गुन्ह्यातील त्याचा साथीदार शुभम ऊर्फ लल्या लोंढे याच्यावर यापूर्वी उरुळी कांचन परिसरातील महाविद्यालयीन विद्यार्थ्याच्या खून प्रकरणात गुन्हा दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. आरोपीने गावठी पिस्टल, जिवंत काडतुसे आणि कोयते नेमके कशासाठी आणले होते, त्याचा वापर कोणत्या गुन्ह्यासाठी होणार होता का आणि या शस्त्रांचा पुरवठा कोणी केला, याचा तपास आता पोलिसांकडून सुरू आहे. या प्रकरणाचा पुढील तपास उरुळी कांचन पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक तारडे करीत आहेत. ही कारवाई पुणे ग्रामीण जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, बारामती विभागाचे अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार आणि उरुळी कांचन पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयमाला पवार यांच्या मार्गदर्शनाखाली दहशतवाद विरोधी शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्ताजीराव मोहिते, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक महेश गायकवाड, निलेश कदम, रवींद्र जाधव, मोसीन शेख, ओंकार शिंदे आणि जालिंदर मुळीक यांच्या पथकाने ही कारवाई केली.




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# तीव्र रक्तक्षयग्रस्त गरोदर मातांच्या उपचारांना गती मिळणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मातृ आरोग्याला प्राधान्य

■ मुंबई (दै. संध्या)

गर्भधारणा हा स्त्रीच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा असून योग्य आहार व देखरेखीद्वारे माता व नवजात शिशुचे आरोग्य राखणे आवश्यक आहे. भारतात अंदाजे ५२ टक्के गर्भवती महिलांमध्ये रक्तक्षय आढळून येतो. रक्तक्षयामुळे प्रसूतीदरम्यान/नंतर मातेच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. तीव्र रक्तक्षय हे माता व नवजात शिशु मृत्यूचे एक महत्त्वाचे कारण आहे. हीच समस्या दूर करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार २०१५ मध्ये आरोग्य विभागाला आयर्न सुक्रोजच्या माध्यमातून ॲनिमियावरील उपचार राबविण्याचे निर्देश दिले होते. यामुळे राज्यातील गरोदर मातांचे आरोग्य अधिक सक्षम करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या मार्गदर्शनात विभागाने तीव्र रक्तक्षयावरील मोफत उपचारांना गती दिली आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्रांपर्यंतच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत आयर्न सुक्रोजचा सिद्ध आणि परिणामकारक उपचार पोहोचविण्यावर मुख्यमंत्र्यांनी भर दिला आहे. या निर्णयामुळे ग्रामीण तसेच दुर्गम भागातील गरोदर मातांनाही तीव्र रक्तक्षय विशेष उपचार सुविधा उपलब्ध होण्यास मदत झाली आहे. मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली मातृ व बाल आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य देत राज्य शासनाचा सार्वजनिक आरोग्य विभाग कार्यरत आहे. तीव्र रक्तक्षयग्रस्त गरोदर मातांना वेळेत उपचार, सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि सक्षम आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या या प्रयत्नांमुळे सुरक्षित मातृत्वाचा पाया अधिक भक्कम होत आहे.

तीव्र रक्तक्षयावर आयर्न सुक्रोज तसेच फेरीक कार्बोक्सी माल्टोज (एफसीएम) या औषधांद्वारे शिरेवाटे उपचार सुविधा राज्यातील शासकीय आरोग्य संस्थांमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे. एचएमआयएस अहवालानुसार चालू वर्षात (२०२६-२७ जुलैअखेर) नोंद झालेल्या एकूण मातांपैकी तपासणीअंती २३५२४ गरोदर मातांची तीव्र रक्तक्षय असलेल्या अतिजोखमीच्या माता म्हणून निदान झाले आहे. त्यापैकी २१३३७ मातांना आयर्न सुक्रोज किंवा फेरीक कार्बोक्सी माल्टोज (एफसीएम) द्वारे उपचार देण्यात आले असून उपचाराचे प्रमाण ९१ टक्क्यांवर पोहोचले आहे.

तपासणी-निदान-उपचार-पुनर्तपासणीवर भर (Four T Strategy)

गरोदरपणातील तीव्र रक्तक्षयामुळे माता आणि गर्भाच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे या समस्येचे वेळीच निदान करून उपचार देणे, उच्च जोखमीच्या मातांचा सातत्याने पाठपुरावा करणे आणि उपचारानंतर पुनर्तपासणी करणे यावर राज्य शासनाने विशेष भर दिला आहे. सार्वजनिक आरोग्य यंत्रणेमार्फत 'तपासणी-निदान-उपचार-पुनर्तपासणी'ही साखळी अधिक परिणामकारक करण्यासाठी (Four T Strategy Test, Talk, Treat, Track ) नियोजनबद्ध उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या 'ॲनिमिया मुक्त भारत अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सन २०१८-१९ पासून प्राथमिक आरोग्य केंद्रे व त्यावरील शासकीय आरोग्य संस्थांमध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तीव्र रक्तक्षयग्रस्त गरोदर मातांना आयर्न सुक्रोज इंजेक्शनद्वारे उपचार देण्यात येत होते. सन २०२४-२५ पासून राज्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्थांमध्ये आयर्न सुक्रोजसोबत, अधिक प्रभावी असलेले इंजेक्शन फेरीक कार्बोक्सी माल्टोजही उपलब्ध करून देण्यात आले. त्यामुळे उपचारांचे पर्याय वाढले असून पात्र मातांना गरजेनुसार जलद व प्रभावी सेवा देणे शक्य झाले आहे.

उपचार पद्धतीचा प्रभावी आणि सुरक्षित वापर व्हावा, यासाठी जानेवारी २०२६ मध्ये राज्यस्तरावर वैद्यकीय अधिकारी व संबंधित आरोग्य कर्मचाऱ्यांचे ऑनलाइन प्रशिक्षण घेण्यात आले. तसेच औषधांचा पुरेसा साठा, वेळेत संदर्भ सेवा आणि उच्च जोखमीच्या गरोदर मातांची स्वतंत्र नोंद ठेवून उपचार पूर्ण होईपर्यंत पाठपुरावा करण्याचे आरोग्य विभागांकडून नियोजन करण्यात आले आहे. या वर्षात जिल्हानिहाय कामगिरीत अनेक जिल्ह्यांनी उल्लेखनीय प्रगती नोंदविली आहे. अहिल्यानगर, लातूर, बीड, चंद्रपूर, वर्धा, रत्नागिरी, वाशिम व बुलढाणा या जिल्ह्यात १०० टक्के तीव्र रक्तक्षयाच्या मातांना उपचार देण्यात आले आहेत. नागपूर, सिंधूदुर्ग, गोंदिया, छत्रपती संभाजीनगर, पुणे, हिंगोली, जालना, धाराशिव व ठाणे या जिल्ह्यांनी ९५ ते १०० टक्क्यांपर्यंत तीव्र रक्तक्षयाच्या मातांना उपचार देऊन साध्य पूर्ण केले आहे. ही कामगिरी राज्यातील मातृ आरोग्य यंत्रणेची तत्परता आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सक्रिय सहभागामुळे शक्य होत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातही उपचार सेवा प्रभावीपणे पोहोचत आहे. लातूर, नाशिक, भिवंडी, कोल्हापूर, उल्हासनगर, नांदेड-वाघाळा, नवी मुंबई, सोलापूर, चंद्रपूर, परभणी व सांगली-मिरज कुपवाड या क्षेत्रांमध्ये उपचारांचे प्रमाण १०० टक्के आहे. इतर सर्व महानगरपालिका क्षेत्रांमध्ये पात्र मातांपर्यंत उपचार वेळेत पोहोचविण्यासाठी स्वतंत्र पाठपुरावा करण्यात येत आहे. उपचारांचे प्रमाण तुलनेने कमी असलेल्या नंदुरबार, सोलापूर, गडचिरोली, पालघर, नाशिक आणि भंडारा या जिल्ह्यांसाठी विशेष कृती आराखडा तयार करण्यात येत आहे. या भागांमध्ये जिल्हानिहाय उद्दिष्टे निश्चित करून आशासेविका, आरोग्यसेविका, वैद्यकीय अधिकारी आणि जिल्हा आरोग्य यंत्रणेमार्फत उपचार कव्हरेज वाढविण्यावर भर दिला जात आहे. शिवाय सार्वजनिक आरोग्य विभागाने तीव्र रक्तक्षय असलेल्या सर्व गर्भवती महिलांना त्यांच्या हिमोग्लोबिनची पातळी वाढविण्यासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली आयर्न सुक्रोज/फेरिक कार्बोक्सि माल्टोज इंजेक्शन देण्यासाठी जानेवारी 2026 ते मार्च 2026 अखेर विशेष मोहीम राबविली आहे. गरोदर मातांवर रक्तक्षयाचे उपचार नेहमी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखालीच करावी लागतात.

गर्भधारणेची नोंद होताच प्रत्येक महिलेची हिमोग्लोबिन तपासणी, आयर्न-फॉलिक ॲसिडच्या नियमित सेवनाबाबत समुपदेशन, पोषक व लोहयुक्त आहाराची माहिती आणि आवश्यकतेनुसार तज्ज्ञांकडे संदर्भ सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे. एचएमआयएस अहवालाच्या माध्यमातून जिल्हा व तालुकानिहाय तपासणी, निदान आणि उपचाराच्या प्रगतीचे नियमित विश्लेषण केले जात आहे.



## कुंभमेळ्यावर आधारित छायाचित्र प्रदर्शनाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन

■ नाशिक (दै. संध्या)



नाशिक त्र्यंबकेश्वर येथे दर १२ वर्षांनी भरणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यावर आधारित छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन आज सायंकाळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यानंतर त्यांनी या प्रदर्शनाची पाहणी केली.

रोटरी क्लब ऑफ नाशिक नाईन हिल्स आणि नाशिक प्रेस फोटोग्राफर्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुदक्षिणा हॉलमधील डॉ. सुनंदा म.गोसावी आर्ट गॅलरीत आजपासून छायाचित्र प्रदर्शन सुरू झाले. ते 30 ऑगस्ट, 2026 पर्यंत नागरिकांसाठी खुले राहणार आहे.

उद्घाटन सोहळ्यास राज्याचे जलसंपदा, आपत्ती व्यवस्थापन तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन, महापौर हिमगौरी आडके, आमदार सरोज अहिरे, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, महंत भक्ती चरणदास महाराज यांच्यासह रोटरी क्लब ऑफ नाशिक नाईन हिल्सचे अध्यक्ष अभय नेरकर, सचिव हर्षद बेळे, कार्यकारी सचिव अभिषेक व्यास, नाशिक प्रेस फोटोग्राफर्स असोसिएशनचे अध्यक्ष सतीश काळे, सचिव प्रशांत खरोटे, सतीश देवगिरे, अशोक गवळी, नीलेश तांबे, अंबादास शिंदे, हेमंत घोरपडे, विवेक बोकील, भूषण पाटील आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर, नागरिक उपस्थित होते.

या प्रदर्शनात सिंहस्थ कुंभमेळ्यांतील दुर्मिळ, अप्रकाशित छायाचित्रे मांडण्यात आली आहेत. सन १९३२ पासूनच्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या ऐतिहासिक आठवणींचा अमूल्य ठेवा या छायाचित्रांमधून उलगड्यात आला आहे. बदलते नाशिक, साधू-संतांचे आखाडे, शाही स्नानाची परंपरा, भाविकांचा महासागर, धार्मिक विधी, तत्कालीन सामाजिक जीवन, कुंभमेळ्याचे बदलते स्वरूप या छायाचित्रांतून पाहावयास मिळणार आहे.

## भगिनींचे प्रेम, सदिच्छा आणि आशीर्वाद हीच माझी ताकद

■ धुळे (दै. संध्या)

भाऊ-बहिणीच्या अतूट प्रेमाचे, जिव्हाळ्याचे आणि विश्वासाचे प्रतीक असलेल्या रक्षाबंधनाच्या पवित्र सणानिमित्त राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी जिल्ह्यातील तसेच राज्यातील सर्व भगिनींना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत. भगिनींनी आजवर दिलेले प्रेम, सदिच्छा आणि आशीर्वाद हीच आपली खरी ताकद असून, हा स्नेहबंध सदैव जपण्याचा प्रयत्न राहील, असे त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटले आहे.

पालकमंत्री श्री. रावल यांनी म्हटले आहे की, रक्षाबंधन हा केवळ एक सण नसून भाऊ-बहिणीच्या नात्यातील प्रेम, आपुलकी, विश्वास आणि परस्परांच्या सुख-दुःखात कायम सोबत राहण्याच्या भावनेचा उत्सव आहे. या पवित्र दिनानिमित्त माझ्या सर्व लाडक्या भगिनींना रक्षाबंधनाच्या लाख लाख शुभेच्छा देतो.

राज्यातील महायुती सरकारने महिलांच्या सक्षमीकरणासाठी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' सुरू केली आहे. या योजनेच्या माध्यमातून भगिनींना केवळ रक्षाबंधनाच्या दिवशीच नव्हे, तर वर्षातील बारा महिने त्यांच्या बँक खात्यात आर्थिक सहाय्याच्या रूपाने शासनाच्या आपुलकीची भेट मिळत आहे. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि स्वावलंबी करण्याच्या शासनाच्या प्रयत्नांमध्ये ही योजना महत्त्वपूर्ण ठरत असल्याचेही त्यांनी संदेशात नमूद केले. "माझ्या सार्वजनिक आणि राजकीय जीवनातील प्रत्येक प्रसंगी भगिनींचे प्रेम, पाठिंबा, सदिच्छा आणि आशीर्वाद मला सातत्याने मिळाले आहेत. वेळोवेळी भगिनींनी मोठ्या आत्मीयतेने 'लाडक्या बहिणींचा लाडका भाऊ, जयकुमार भाऊ' अशा घोषणा देत माझ्यावर प्रेम व्यक्त केले. हा जिव्हाळा आणि विश्वास माझ्यासाठी अनमोल आहे. त्याबद्दल मी सर्व भगिनींचे मनःपूर्वक आभार मानतो," असे पालकमंत्री श्री. रावल यांनी म्हटले आहे.

## न्यायिक सेवा पूर्व प्रशिक्षणासाठी वकिलीचा अनुभव ३ वर्षांवरून १ वर्ष

■ पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विधी/न्यायिक सेवा परीक्षा (JMFC व CJJD) पूर्व प्रशिक्षण योजनेच्या पात्रतेत महत्त्वपूर्ण बदल करण्यात आला आहे. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका (सिव्हिल) क्र. १११०/२०२५ च्या संदर्भात दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर परीक्षेसाठी आवश्यक असलेला वकिलीचा अनुभव (Law Practice) तीन वर्षांवरून एक वर्ष करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाच्या अनुषंगाने सामायिक चाळणी परीक्षा-२०२६ च्या ऑनलाइन अर्ज प्रक्रियेत, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विधी/न्यायिक सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनेसाठी असलेली तीन वर्षांच्या वकिलीच्या अनुभवाची अट बदलून एक वर्ष करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या सर्वंकष धोरणाच्या अनुषंगाने वर्ष २०२६-२७ करिता टीआरटीआय, बार्टी, सारथी, अमृत आणि आर्टी या स्वायत्त संस्थांमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनांसाठी घेण्यात येणाऱ्या सामायिक चाळणी परीक्षा-२०२६ करिता ऑनलाइन अर्ज करण्याची प्रक्रिया दिनांक ९ ऑगस्ट २०२६ पासून सुरू करण्यात आली आहे.

टीआरटीआय, बार्टी, सारथी, अमृत आणि आर्टी या संस्थांच्या लक्षित गटातील पात्र व इच्छुक उमेदवारांनी सुधारित पात्रता निकषाची नोंद घेऊन त्यानुसार ऑनलाइन अर्ज करावा, असे आवाहन निलेश सागर (भा.प्र.से.), अध्यक्ष, स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण अंमलबजावणी व समन्वय समिती तथा आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (आसंप्रसं), पुणे यांनी केले आहे.

## सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्या निर्देशानुसार तळेगाव-चाकण-शिक्रापूर मार्गाच्या दुरुस्तीला वेग

■ पुणे (दै. संध्या)

तळेगाव-चाकण-शिक्रापूर (रा.म.-५५) राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८-डी या महत्त्वाच्या औद्योगिक व वाहतूक मार्गावरील रस्त्याची पावसाळ्यात झालेली दुरवस्था लक्षात घेऊन सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या निर्देशानुसार रस्ते दुरुस्तीची कामे युद्धपातळीवर हाती घेण्यात आली आहेत. नागरिक व वाहनचालकांना होणारा त्रास कमी करून वाहतूक सुरळीत करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

तळेगाव-चाकण-शिक्रापूर मार्गाची एकूण लांबी ५४ किलोमीटर आहे. त्यापैकी तुलनेने कमी खराब झालेल्या सुमारे ४० किलोमीटर लांबीच्या रस्त्याची दुरुस्ती पुढील दोन दिवसांत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच MIDC पट्ट्यातील सुमारे १४ किलोमीटर रस्त्याची अधिक दुरवस्था झाल्याने या भागातील खड्डे बुजविणे, साईड शोल्डरची दुरुस्ती तसेच आवश्यक भरावाची कामे पुढील चार दिवसांत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

वाहतुकीची वाढती गरज लक्षात घेऊन या मार्गावरील सुमारे १२ किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे रुंदीकरण पुढील दोन महिन्यांत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

गेल्या वर्षीचा अनुभव लक्षात घेऊन तसेच रस्त्याची तातडीची दुरुस्ती आवश्यक असल्याने या मार्गावरील दुरुस्तीचे काम एका वर्षासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाऐवजी राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यासाठी तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री कै. अजितदादा पवार आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी विशेष लक्ष देऊन ५४ किलोमीटर रस्त्याच्या दुरुस्ती तसेच काही भागातील रुंदीकरणासाठी ५९ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता.

त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने जानेवारी २०२६ मध्ये कार्यारंभ आदेश देऊन काही भागात काम सुरू केले होते. मात्र, रस्त्यालगतच्या विविध सेवा वाहिन्यांमुळे निर्माण झालेले अडथळे तसेच युद्धजन्य परिस्थितीमुळे डांबर उपलब्ध होण्यात आलेल्या अडचणींमुळे कामाला अपेक्षित गती देता आली नाही.

पावसाळ्यात रस्त्याची झालेली दुरवस्था लक्षात घेऊन आता दुरुस्तीच्या कामाला गती देण्यात आली आहे. मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडून रस्त्याच्या कामाचा वेळोवेळी आढावा घेण्यात येत असून, रस्त्याची परिस्थिती तातडीने सुधारण्यासाठी संबंधित यंत्रणांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार दुरुस्तीची कामे निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करण्यावर भर देण्यात येत आहे. दरम्यान, तळेगाव-चाकण-शिक्रापूर मार्गाच्या कायमस्वरूपी दर्जोन्नतीसाठी महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळामार्फत (MSIDC) काम हाती घेण्यात येणार असून, पुढील तीन महिन्यांत या कामाला सुरुवात होण्याचे नियोजन आहे.

या दर्जोन्नतीमुळे मार्गाची वाहतूक क्षमता वाढण्यास तसेच भविष्यातील वाहतूक कोंडी आणि रस्त्याच्या दुरवस्थेचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यास मदत होणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरू असलेली तातडीची दुरुस्ती आणि MSIDC मार्फत प्रस्तावित दर्जोन्नतीची कामे पूर्ण झाल्यानंतर तळेगाव-चाकण-शिक्रापूर मार्गावरील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम, सुरक्षित आणि गतिमान होण्यास मदत होणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे

### त्रुटींची तातडीने पूर्तता करण्याचे आवाहन

पुणे : जात वैधता प्रमाणपत्राअभावी मागासवर्गीय विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशापासून वंचित राहू नयेत, यासाठी ज्या अर्जदार/विद्यार्थ्यांनी अद्यापही वैधता प्रमाणपत्रातील त्रुटींची पूर्तता केलेली नाही, त्यांनी संबंधित जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीशी त्वरित संपर्क साधावा, तसेच त्रुटींची पूर्तता करावी, असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (बार्टी), महासंचालक तथा राज्यातील सर्व जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांच्या मुख्य समन्वयक, श्रीमती दीपा मुधोळ-मुंडे यांनी केले आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून उच्च शिक्षण, तंत्रशिक्षण, कृषी शिक्षण, वैद्यकीय/आयुष शिक्षण आणि कला शिक्षण विभागाच्या विविध पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये राखीव प्रवर्गातून प्रवेशासाठी केंद्रभूत प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येत आहे. अभ्यासक्रम प्रवेशाच्या तारखा राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून जाहीर करण्यात आलेल्या आहेत. तरीही, समित्यांकडे अनेक विद्यार्थ्यांनी उशिराने अर्ज सादर केल्याचे दिसून आले आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी पात्र विद्यार्थ्यांना त्रुटींची पूर्तता करण्याबाबत एसएमएस, ईमेल व पत्राद्वारे संबंधित समित्यांमार्फत कळवण्यात आले असतानाही, अनेक अर्जदार/विद्यार्थ्यांनी संबंधित समितीशी संपर्क साधलेला नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्रुटींची पूर्तता करण्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदारांचीच आहे. अर्जदारांची गैरसोय होऊ नये यासाठी, आवश्यकतेनुसार जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांनी सुट्टीच्या दिवशीही कार्यालय सुरू ठेवावे, असे निर्देश महासंचालक, बार्टी तथा मुख्य समन्वयक, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या यांना देण्यात आले आहेत.

### ई-स्पोर्ट्स गेम्स फेडरेशनच्या अध्यक्षपदी माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार

मुंबई :"ई-स्पोर्ट्स गेम्स फेडरेशन" (ESGF) च्या अध्यक्षपदाची धुरा इलेक्ट्रॉनिक, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता विकास मंत्री तथा सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी स्वीकारली. देशातील २२ राज्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत झालेल्या फेडरेशनच्या सर्वसाधारण बैठकीत ॲड. शेलार यांची निवड करण्यात आली. माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार म्हणाले की, ई-स्पोर्ट्स क्षेत्राला अधिक शिस्तबद्ध, पारदर्शक आणि व्यावसायिक स्वरूप मिळावे, त्यातून आर्थिक गुंतवणूक मोठ्या प्रमाणात होऊ शकेल व आपल्या देशात रोजगार उपलब्ध होऊ शकेल. युवा पिढीतील डिजिटल कौशल्यांना व्यासपीठ देतानाच ई-स्पोर्ट्सला केवळ मनोरंजन किंवा गेमिंग न मानता कौशल्य, शिस्त, प्रशिक्षण आणि करिअरची संधी असलेले क्षेत्र म्हणून विकसित करण्याचे आव्हान स्वीकारून तरुणांसाठी काम करू. मैदानी खेळाप्रमाणे ई-स्पोर्ट्समध्येही प्रावीण्य असलेले खेळाडू तयार करू. त्यासाठी विविध राज्यांच्या फेडरेशनशी समन्वय साधून केंद्र सरकारशी आवश्यक तो संवाद साधू, असेही नवनियुक्त अध्यक्ष शेलार यांनी सांगितले. ESGF ही आपल्या देशातील ई-स्पोर्ट्सच्या विकासासाठी कार्यरत महत्त्वाची संस्था असून या क्षेत्रात झपाट्याने होणारी वाढ पाहता यातील नव्या संधी तरुणांना उपलब्ध करून देण्यासाठी ही संस्था कार्यरत आहे. आपल्या देशात ई-स्पोर्ट्स आणि गेमिंग क्षेत्राचा विस्तार प्रचंड वेगाने होत आहे. भारतात सुमारे ५२ कोटी गेमर्स असून दिवसाला ११ कोटी खेळाडू खेळतात. आपल्या देशात २८ या खेळांच्या टूर्नामेंट होतात. हे गेम पाहणाऱ्यांची संख्या सुमारे ८ ते ९ कोटी एवढी आहे. पारंपरिक क्रिकेट, फुटबॉल किंवा हॉकीमध्ये जसे राष्ट्रीय संघ, निवड प्रक्रिया, स्पर्धा, प्रशिक्षण, नियम आणि आंतरराष्ट्रीय प्रतिनिधित्वाची व्यवस्था असते, त्याच धर्तीवर ई-स्पोर्ट्समध्येही एक संरचित व्यवस्था उभारण्याचे काम हे फेडरेशन करते.

## थोडक्यात पण महत्वाचे



### कामगारांसोबत रक्षाबंधन सोहळा, खंडागळे अध्यासन मंडळाचा प्रबोधनात्मक उपक्रम

**जेजुरी : दैनिक संध्या**

महाराष्ट्रातील महत्त्वपूर्ण सण असलेल्या रक्षाबंधनाचा उत्साह जेजुरी शहरातही विविध उपक्रमांच्या माध्यमातून पाहायला मिळाला. जेजुरी नगरपालिका परिषदेत कार्यरत असलेल्या मोलमजुरी करणाऱ्या व स्वच्छता कामगार महिलांसोबत यंदाही खंडागळे अध्यासन मंडळाच्या वतीने रक्षाबंधन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी खंडागळे अध्यासन चे डॉ. प्रसाद खंडागळे यांनी नगरपालिका स्वच्छता कामगार महिलांकडून राखी बांधून घेतली. दिवसभर जेजुरी शहराची झाडलोट, स्वच्छता व साफसफाईचे काम करणाऱ्या या महिलांना उपयोगी ठरेल, या उद्देशाने जपानी तंत्रज्ञानावर आधारित गरम-गार पाण्याची वॉटर बॉटल भेट देण्यात आली. या उपक्रमातून रक्षाबंधनाच्या निमित्ताने सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला. या वेळी जेजुरी सेवा संघाचे डॉ. नितीन केंजळे, प्रकाश खाडे, प्रजापिता ब्रह्माकुमारी जेजुरी शाखेच्या ज्योती दीदी, संगीता चांदेकर, पुष्कर खाडे, उत्तम चांदेकर, गोपाल मोहरकर आदी उपस्थित होते. हेंकल कंपनी व खंडागळे अध्यासनच्या माध्यमातून जिल्ह्यातील विविध शाळांना अवकाश निरीक्षण केंद्र,शैक्षणिक साहित्य,कलावंत,वाघ्या मुरुळी यांना मदत,दरवर्षी दीडशे गरजू कुटुंबियांना दिवाळी साहित्य वाटप,करण्यात येते. यावेळी बोलताना डॉ. प्रसाद खंडागळे म्हणाले, “नगरपालिकेच्या स्वच्छता कामगारांसोबत रक्षाबंधन आणि भाऊबीजसारखे कार्यक्रम साजरे केल्याने समाजातील विविध घटकांतील सर्वसामान्य नागरिकांशी प्रेमाचे नाते जोडले जाते, याचा मला अभिमान आहे. जीवात जीव असेपर्यंत असे सामाजिक कार्य सुरू ठेवणार आहे.” रक्षाबंधनाच्या निमित्ताने स्वच्छता कामगारांच्या सन्मानासोबतच त्यांच्या दैनंदिन कामाची जाणीव समाजाला करून देणारा हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचा आदर्श ठरला.



### गणेशमूर्तींवर अखेरचा हात फिरवण्याची मूर्तिकार मग्न

**राजगुरूनगर: दैनिक संध्या**

अवघ्या काही दिवसावर येऊन ठेपलेल्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणेशमूर्तींवर अखेरचा हात फिरवण्याची लगबग मूर्तिकारांकडून सुरू झाली असल्याचे चित्र राजगुरुनगर परिसरात दिसत आहे. महागाईची झळ बसूनही गणेशमूर्तींना यंदाही मागणी कायम असल्याचे मूर्तिकार सांगत आहे. राजगुरूनगर येथील कुंभारवाड्यातील पारंपरिक कुंभार समाजातील कारागीर बरोबर इतर मूर्तिकार गणेशमूर्तींचे काम अंतिम टप्प्यात नेण्यासाठी दिवस-रात्र मेहनत घेत आहेत. आकर्षक रंगकाम, सजावट आणि मूर्तींना अंतिम रूप देण्याचे काम सध्या वेगाने सुरू आहे. गणेशोत्सव काही दिवसांवर आल्याने विविध आकारांच्या गणेशमूर्तींना मागणी वाढली असून,एक ते दीड फुटापर्यंत मागणी जास्त असल्याचे मूर्तिकार सांगत आहे. दगडू शेठ,लालबाग,आणि नवीन टेन्ट मध्ये बेबी डॉल मूर्तींना अधिक मागणी असल्याने ग्राहकांच्या पसंतीनुसार मूर्ती तयार करून देण्यासाठी कारागीर अहोरात्र झटत आहेत. मूर्ती साच्यातून काढण्यापासून त्यास रंगसंगती,फिनिशिंग, सजावट करून मूर्ती पूर्णत्वास नेण्याचे काम रात्रंदिवस सुरू आहे.पर्यावरणाच्या दृष्टीने शाडूच्या लहान मूर्तींना मागणी दिसून येत आहे. काही कारागीर गणेश मूर्ती साठी प्रसिद्ध असलेल्या पेण येथून कच्च्या मूर्ती आणून व रंगसंगतीने मूर्तीमध्ये जिवंतपणा आणण्याचे काम करत आहे. वाढलेल्या कच्च्या मालाच्या किमती, रंग, सजावटीचे साहित्य तसेच मजुरीमुळे खर्च वाढला असला तरी गणेशभक्तांचा उत्साह कायम असल्याचे मूर्तिकार आनंदा कुंभार व हरीश कुंभार यांनी सांगितले. राजगुरुनगर येथील कुंभारवाड्यातील मूर्तिकारांनी आजही आपला पारंपरिक व्यवसाय जपत गणेशमूर्ती घडविण्याची कला जोपासली आहे. मात्र, वाढती महागाई, मनुष्यबळाचा अभाव आणि नोकरी-व्यवसायाच्या निमित्ताने तरुणाईचा पारंपरिक व्यवसायाकडे होत असलेले दुर्लक्ष यामुळे या कलेसमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे. पूर्वी कुंभारवाड्यातील अनेक कुटुंबे गणेशमूर्ती घडविण्याच्या व्यवसायात सक्रिय होती. मात्र, बदलत्या काळानुसार तरुण पिढीने नोकरी व इतर व्यवसायांकडे वळण्यास सुरुवात केल्याने या पारंपरिक व्यवसायात काम करणाऱ्या कारागिरांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. त्यामुळे सध्या बोटावर मोजण्याइतकेच मूर्तिकार हा व्यवसाय पुढे नेत आहेत.



### राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी घेतले खंडोबा देवाचे दर्शन जेजुरी भाजपाच्या वतीने स्वागत

**जेजुरी : दैनिक संध्या**

जेजुरी येथे जेजुरी शहर भारतीय जनता पार्टीच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले जेजुरी शहरअध्यक्ष सचिन पेशवे यांनी केले.यावेळी माजी नगरसेवक हेमंत सोनवणे,भाजपचे पदाधिकारी अलका शिंदे,नगरसेवक अविनाश डोंबे,मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले,श्री मार्तंड देवसंस्थान चे अध्यक्ष विश्वास पानसे,विश्वस्त मंगेश घोणे ॲड पांडुरंग थोरवे उपस्थित होते. नगर-उत्थान मधून विविध विकास कामासाठी सुमारे 13 कोटीचा निधीला शासकीय मंजूरी मिळाली असून त्यांचा निधी अजून मिळालेला नाही त्याचा निधी लवकर मिळावा अशी मागणी शहराध्यक्ष सचिन पेशवे यांनी केली

# जपानी संशोधकांची शहा फार्म्स ॲग्री टुरिझमला भेट

■ **पिंपरी (दै. संध्या)**

जपानमधील पोस्टडॉक्टोरल संशोधक मिचिहिरो ओगावा ,शिनोबू इगुरो ,सेइका वाझाकी , वाकाको मियाझावा, सातोमी हिगाशी या शिष्टमंडळाने नुकतेच भात लागवडीतील जलव्यवस्थापनाच्या पद्धतींचा अभ्यास करण्यासाठी मावळ परिसरातील चांदखेड येथील शहा फार्म्सला भेट दिली. या भेटीदरम्यान शिष्टमंडळाला स्थानिक सिंचन पद्धती, पाण्याची उपलब्धता आणि भात लागवडीच्या पद्धतींची प्रत्यक्ष माहिती घेण्याची संधी मिळाली.

शहा फार्म्सचे मालक ॲड. विजय शहा, प्रशांत शहा आणि डॉ. वार्तिका शहा यांच्याशी झालेल्या संवादादरम्यान शिष्टमंडळाने सिंचनाच्या पद्धती, भात लागवडीचे चक्र, पिकानुसार पाण्याची गरज तसेच सिंचनाचे प्रमुख स्रोत याबाबत सविस्तर चर्चा केली.

शहा फार्म्स ॲग्रीटुरिझमचे संचालक प्रशांत शहा यांनी भात लागवडीच्या विविध टप्प्यांची माहिती देताना फार्मवर



अवलंबल्या जाणाऱ्या जलव्यवस्थापनाच्या वेगवेगळ्या पद्धतींविषयी चर्चा केली. शिष्टमंडळाने शिवार फेरी करत भातशेतीची पाहणी केली, तसेच शेतातील पाण्याची पातळी, खुल्या विहिरी, बोअरवेल, शेततळे आणि बंधारे यांसारख्या विविध सिंचन स्रोतांची माहिती घेतली.

स्थानिक जलस्रोतांचे व्यवस्थापन आणि प्रशासन याबाबतही शिष्टमंडळाने माहिती जाणून घेतली. यामध्ये पाटबंधारे खाते व ग्रामपंचायतीची भूमिका, जलस्रोतांची देखभाल तसेच शेतकऱ्यांना सहाय्य करणाऱ्या विविध शासकीय अनुदान योजना आणि उपक्रमांचा समावेश होता. ॲड. विजय शहा यांनी फार्म विकसित करण्याचा आपला अनुभव सांगताना गावकरी आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी रोटरीच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांवरही प्रकाश टाकला.

कृषी आणि ॲग्रीटुरिझम केंद्र म्हणून शहा फार्म्सने ज्ञानाच्या देवाणघेवाणीसाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. तसेच संशोधकांना ग्रामीण समुदायाशी जोडून स्थानिक शेती पद्धतींबद्दल अधिक माहिती करून देण्यास हातभार लावला. जलसंवर्धन, कार्यक्षम सिंचन आणि शाश्वत शेती याबाबत विचारांची व अनुभवांची देवाणघेवाण घडवून आणण्यासाठी अशा संवादांचा उपयोग होऊ शकतो. तसेच सुधारित कृषी पद्धती आणि उपलब्ध शासकीय सहाय्यव्यवस्थेबाबत अधिक माहिती मिळाल्याने त्याचा शेतकऱ्यांनाही लाभ होऊ शकतो. या भेटीदरम्यान शिष्टमंडळाने पिठलं व भाकरी यांसारख्या अस्सल महाराष्ट्रीय ग्रामीण भोजनाचा आस्वाद घेत स्थानिक संस्कृती आणि आदरातिथ्याचाही अनुभव घेतला. ही भेट कृषीविषयक ज्ञान आणि आंतरराष्ट्रीय अनुभवांच्या अर्थपूर्ण देवाणघेवाणीचे प्रतीक ठरली. संशोधन आणि स्थानिक पातळीवरील शेती यांच्यातील दुवा अधिक दृढ करण्यासोबतच, भविष्यातील शेती आणि ग्रामीण समुदायांसाठी शाश्वत जलव्यवस्थापनाचे महत्त्वही या भेटीतून अधोरेखित झाले.





## जिल्हा लॅबोरेटरी टेक्निशियन कार्यशाळा संपन्न

■ **चाकण : (दै. संध्या)**

पुणे अॅक्लॅब संघटनेच्या वतीने पुणे जिल्ह्यातील लॅबोरेटरी टेक्निशियन बांधवांची विशेष कार्यशाळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. या कार्यशाळेचे आयोजन खेड तालुका संघटनेच्या वतीने करण्यात आले होते.

या कार्यक्रमास राज्य अॅक्लॅब संघटनेचे अध्यक्ष प्रशांत गुळेकर तसेच डॉ. संतोष बोरकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच राज्य संघटनेचे सचिव रमेश चौगुले, खजिनदार उमेश सोनार, संचालक संजय जाधव, ज्येष्ठ मार्गदर्शक रघुनाथ भोंगळे यांची विशेष उपस्थिती लाभली. यावेळी पुणे जिल्हा संघटनेचे अध्यक्ष मोहन मेटकरी, दिलीप पोकळे तसेच सचिव किशोर चव्हाण हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस खेड तालुका संघटनेचे अध्यक्ष विलास मांजरे यांनी प्रास्ताविकात लॅबोरेटरी टेक्निशियन बांधवांचे स्वागत केले. त्यांनी या कार्यशाळेचे महत्त्व अधोरेखित करत लॅबोरेटरी टेक्निशियन बांधवांच्या संघटनात्मक एकजुटीची आवश्यकता व्यक्त केली.

कार्यक्रमाला खेड तालुका प्रतिनिधी संदेश ओरपे, ऋषिकेश बोंबले, महिला प्रतिनिधी हेमा खडके, संगीता भालेराव, संगीता एंडाईत, राजश्री गुंडाळ, पोर्णिमा देव्हरकर आदी उपस्थित होते.

यावेळी मानद संचालक व नविन सभासद यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. संतोष बोरकर यांनी संधिवात व सांध्याचे आजार याविषयी मार्गदर्शन केले. प्रशांत गुळेकर यांनी प्रयोगशाळा क्षेत्रातील बदलते तंत्रज्ञान, अद्ययावत ज्ञान, गुणवत्ता, जबाबदारी तसेच संघटनात्मक बांधिलकी व शासन कायदा धोरण या विषयांवर मार्गदर्शन केले. सचिव रमेश चौघुले, खजिनदार उमेश सोनार, जिल्हा अध्यक्ष दिलीप पोकळे, सुग्रीव फड यांनी आपले विचार व्यक्त केले.

कार्तिकी गुंडाळ हिने गणेश वंदना सादर केली. सूत्रसंचालन चंद्रकांत हिवरकर यांनी केले. नारायण पवार, सुग्रीव फड व रामप्रभु आदी उपस्थित होते. सुधीर भालेराव यांनी आभार मानले. ही कार्यशाळा पुणे जिल्ह्यातील लॅबोरेटरी टेक्निशियन बांधवांसाठी ज्ञानवर्धक, प्रेरणादायी आणि संघटनात्मकदृष्ट्या महत्त्वपूर्ण ठरल्याची भावना चंद्रकांत हिवरकर, संगीता भालेराव व संगीता एंडाईत यांनी व्यक्त केली.

## चाकणला एकतानगर चौकात बसविले सीसीटीव्ही कॅमेरे

■ **चाकण (दै. संध्या)**

चाकण नगरपरिषद हद्दीतील एकतानगर चौकात सीसीटीव्ही कॅमेरे बसवून नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यात आले आहे. एकतानगर परिसरात रस्त्यावर वारंवार घडणाऱ्या चोरीच्या घटना तसेच अपघातांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. चाकण नगरपरिषदेचे नगरसेवक रणजित जरे यांच्या पुढाकारातून एकतानगर चौकात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. एकतानगर चौक हा वर्दळीचा परिसर असल्याने या ठिकाणी चोरीच्या घटना तसेच अपघात घडण्याचे प्रकार समोर येत होते. या पार्श्वभूमीवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आल्याने परिसरातील हालचालींवर लक्ष ठेवण्यास मदत होणार असून, चोरीच्या घटनांचा तपास, संशयितांचा शोध तसेच अपघातांच्या घटनांमध्ये आवश्यक पुरावे मिळविण्यास पोलिसांना मोठी मदत होणार आहे.

चाकण उत्तर पोलिसांकडून नगरसेवक जरे यांचे कौतुक होत आहे. एकतानगर चौकात सीसीटीव्ही कॅमेरा बसविण्यात आल्याने परिसरातील गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी तसेच अपघातांच्या तपासामध्ये सीसीटीव्ही फुटेज अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याने पोलिसांनी या सामाजिक उपक्रमाला धन्यवाद दिले. यावेळी चाकण उत्तर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम, नगराध्यक्षा मनीषा गोरे, उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी, नगरसेवक रणजित जरे, नगरसेविका रूपाली कांडगे, विशाल नायकवाडी, समिर सिकीलकर, कालिदास वाडेकर, शेखर पिंगळे, अभिजीत जाधव, अमृत शेवकरी, जमिर काझी, प्रमोद टिळेकर, मुबिन काझी, उमेश गोरे आदी उपस्थित होते.

> नागरिकांची सुरक्षितता हीच प्राथमिकता ठेवून लोकप्रतिनिधी म्हणून येथील ग्रामस्थांनी घेतलेला हा पुढाकार निश्चितच कौतुकास्पद आहे. नागरिक आणि पोलिस प्रशासन यांच्यातील समन्वयातून सुरक्षित परिसर निर्माण करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.
>
> - जितेंद्र कदम, पोलीस निरीक्षक, चाकण.

### आमिष दाखवून ३३.४४ लाखांची फसवणूक!

■ **पिंपरी (दै. संध्या)**

गुंतवणुकीवर भरघोस परतावा देण्याचे आमिष दाखवून अनेक नागरिकांची ३३ लाख ४४ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली. याप्रकरणी राहुल भोलेनाथ भोसले (३०, रा. चऱ्होली खुर्द, खेड, जि. पुणे) यांनी तक्रार दिली आहे. त्यानुसार, भागवत गंगाधर पऱ्हाड (रा. आळंदी, खेड) आणि एका महिला आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी एक लाख रुपयांच्या गुंतवणुकीवर दररोज ५०० रुपये परतावा देण्याचे आमिष दाखवले. त्यानुसार फिर्यादीसह त्यांच्या ओळखीच्या योगेश वंजारी यांच्याकडून १ लाख ७० हजार, यशवंत गावडे यांच्याकडून १० लाख तसेच शुभम लोखंडे व मोनिका लोखंडे यांच्याकडून ६ लाख रुपये घेतले.

## धोकादायक रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी ८ सप्टेंबरला आमरण उपोषण

■ **चाकण : (दै. संध्या)**

चाकण लगतच्या वाघजाईनगर परिसरातील चाकण - तळेगाव रोड ते आंबेठाण रोड हा महत्त्वपूर्ण रस्ता संपूर्णपणे खड्ड्यांत गेला आहे. चाकण भागातील धोकादायक रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी मंगळवारी (दि.८ सप्टेंबर) येथील उद्योजक व माजी उपसरपंच ज्ञानेश्वर शिळवणे आमरण उपोषणाला बसणार आहेत.

चाकण भागातील रस्त्यांचे खड्ड्यात रूपांतर झाले आहे. ग्रामस्थ आणि औद्योगिक कंपन्यांच्या वाहतुकीसाठी सर्वच रस्ते अत्यंत धोकादायक बनले आहेत. हा रस्ता तातडीने दुरुस्त करण्यात यावा यासाठी शिळवणे हे वाघजाई नगर येथे दि. ८ सप्टेंबर पासून आमरण उपोषणास बसणार आहेत. सुमारे १४ वर्षांपूर्वी विकसित करण्यात आलेला हा रस्ता, वाघजाईनगर परिसरातील ग्रामस्थ, हजारो कामगार आणि अनेक औद्योगिक कंपन्यांसाठी जीवन वाहिनी ठरला आहे. मात्र, जलवाहिनीच्या पाइपलाइन टाकण्याच्या कामासाठी रस्त्याचे खोदकाम करण्यात आले. यानंतर कामाची योग्य रीतीने दुरुस्ती न झाल्याने रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून, त्याची अवस्था अत्यंत चिंताजनक झाली आहे. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे दैनंदिन प्रवासात ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिसरातील कंपन्यांच्या वाहतुकीवर याचा गंभीर परिणाम होत असून, वारंवार वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. दुचाकी, चारचाकी तसेच अवजड वाहनांसाठी हा रस्ता आता अपघाताला आमंत्रण ठरत आहे. रुग्णवाहिका, कामगारांची वाहतूक आणि इतर अत्यावश्यक सेवांना यामुळे अडथळे येत आहेत. सध्या मुरुमाने या मार्गावरील खड्डे भरले जात असले तरी ते अल्पावधीत जैसे थे होतील. यासाठी पक्क्या स्वरूपात हे खड्डे भरून तात्काळ रस्ता नवीन करावा, अशी मागणी उद्योजक बाळासाहेब शिळवणे यांनी केली आहे.

रस्त्यात खड्डे पडल्याने दैनंदिन प्रवासात ग्रामस्थांना मोठ्या अडचणी येऊ लागल्या आहेत. कंपन्यांच्या वाहतुकीवर गंभीर परिणाम होऊ लागला असून, अपघातांचा धोका वाढल्याने अत्यावश्यक सेवांना अडथळे येऊ लागले आहेत. पीएमआरडीए कडून तातडीच्या कार्यवाहीची मागणी शिळवणे यांनी केली आहे.



> हा रस्ता पीएमआरडीएच्या माध्यमातून विकसित झाला असल्याने प्राधिकरणाने उपलब्ध निधीतून किंवा शासकीय अनुदानातून रस्त्याची तातडीने दुरुस्ती आणि पुनर्बांधणी करावी या मागणीवर वाघजाईनगर येथील ग्रामस्थ ठाम आहेत. प्रशासनाने या गंभीर बाबीची दखल घेऊन तातडीने रस्ता दुरुस्तीच्या कामाला सुरुवात करावी, अशी मागणी चाकण लगतच्या वाघजाई नगर हद्दीतील रस्त्याच्या दुरवस्थेकडे प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे. रस्ता दुरुस्तीकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी मंगळवारी (दि. ८ सप्टेंबर) वाघजाईनगर येथे आमरण उपोषणास बसणार आहे."
>
> - बाळासाहेब शिळवणे, उद्योजक

# चाकण बाजारात हिरवी मिरची, कांदा, मेथी व भेंडीची विक्रमी आवक

■ **चाकण (दै. संध्या)**

खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये हिरवी मिरची, कांदा, मेथी व भेंडीची किरकोळ आवक झाली. पालेभाज्यांचे भाव गडगडले आहेत. एकूण उलाढाल ५ कोटी १० लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक १ हजार २०० क्विंटल झाली. कांद्याला कमाल भाव १,५०० ते ४,००० रुपये मिळाला. बटाट्याची एकूण आवक १,५०० क्विंटल झाली. बटाट्याला कमाल भाव १,५०० रुपये मिळाला. लसणाची एकूण आवक ३५ क्विंटल झाली. लसणाचा कमाल भाव १८ हजार रुपयांवर पोहोचला. हिरव्या मिरचीची एकूण आवक २८५ क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला २ हजार रुपयांपासून ते ३ हजार ५०० रुपयांपर्यंत भाव मिळाला. शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे : कांदा - एकूण आवक - १,२०० क्विंटल. भाव क्रमांक - १.४,००० रुपये, भाव क्रमांक २. ३,००० रुपये, भाव क्रमांक ३. १,५०० रू. बटाटा - एकूण आवक - १,५०० क्विंटल. भाव क्रमांक १.१,५०० रुपये, भाव क्रमांक २.१,२०० रुपये, भाव क्रमांक ३.८०० रुपये. फळभाज्या : फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे - टोमॅटो - २९३ क्विंटल (६०० ते १,३०० रू.), कोबी - २१० क्विंटल (७०० ते १,५०० रू.), फ्लॉवर - १९५ क्विंटल (१,००० ते १,८०० रु.), वांगी - ९२ क्विंटल (१,००० ते २,००० रु.), भेंडी - ९२ क्विंटल (१,००० ते २,००० रु.), दोडका - ५६ क्विंटल (१,५०० ते ३,५०० रु.), कारली - ६८ क्विंटल ( १,५०० ते ३,५०० रु.), दुधीभोपळा - ४७ क्विंटल (१,०० ते २,५०० रु.), काकडी - ७८ क्विंटल (१,००० ते २,००० रु.), फरशी - २० क्विंटल (२,५०० ते ३,००० रु.), वालवड - ६४ क्विंटल (१,५०० ते ४,००० रुपये), ढोबळी मिरची - १३६ क्विंटल (१,००० ते २,५०० रु.), चवळी - २८ क्विंटल (२,००० ते ३,५०० रु.), शेवगा - ३० क्विंटल (३,००० ते ४,५०० रु.), गाजर - १५० क्विंटल (१,५०० ते २,००० रु.), गवार - ३८ क्विंटल (४,००० ते ८,००० रु. ), आले - १७५ क्विंटल (५,००० ते १२,००० रु. ),.

